रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ९१
www.ramprahar.com
बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतराळ स्टेशन, चंद्रावर पाऊल भारताचे नवे ध्येय



**नवी दिल्ली :** चांद्रयान-३ आणि आदित्य एल१च्या यशस्वीतेनंतर आता भारताने आणखी दोन महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमा राबवण्याचा मानस व्यक्त केला आहे. यामध्ये सन २०३५पर्यंत भारताचे स्वतःचे अंतराळ स्टेशन स्थापन करणे आणि २०४०पर्यंत चंद्रावर भारतीयास पाठवणे या दोन मोहिमांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याबाबत एका उच्चस्तरीय बैठकीत अंतराळ विभागाला हे ध्येय निश्चित करण्याचे निर्देश दिले. पीएमओने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेच्या तयारीची माहिती जाणून घेण्यासाठी एक उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. या वेळी अंतराळ विभागाच्या अधिकाऱ्यांनी नव्या मोहिमांबाबत सविस्तर माहिती दिली.

अंतरंग
उरणमधील कळंबुसरेत जुगार अड्ड्यावर धाड/२
शिक्षक आणि पदवीधारकांनी मतदार नावनोंदणी करावी/६
रोलर स्केटिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंचे यश/८

# राज्यात लवकरच शिक्षक भरती

## ३० हजार रिक्त पदे भरणार; शिक्षणमंत्र्यांची माहिती



**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात शिक्षक भरतीसाठी २३ जिल्ह्यांतील रिक्त पदांची लवकरच जाहिरात जाहीर केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. ते शिक्षण परिषदेसाठी पुण्यात आले असता बोलत होते.

राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया रखडली होती, पण आता अखेर शिक्षक भरती प्रक्रियेला वेग आला असून २३ जिल्ह्यांतील रिक्त पदांच्या शिक्षक भरतीसाठी लवकरच जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संदर्भात तारीख निश्चित करण्यात आलेली नसली तरी या संदर्भात तातडीची पावले राज्य सरकारकडून उचलण्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आतापर्यंत बिंदूनामावली आणि अन्य तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झालेल्या २३ जिल्ह्यांतील रिक्त पदांची पहिल्या टप्प्यात भरती करण्यात येणार आहे. पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येईल, असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

राज्यातील लाखो उमेदवारांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदांच्या जाहिरातीकडे लागले आहे. त्याचवेळी शिक्षणमंत्र्यांकडून शिक्षक भरतीबद्दल स्पष्ट संकेत मिळाल्याने भरती प्रक्रियेसंदर्भातील घडामोडींना वेग आल्याचे पहायला मिळत आहे.

# रायगडातील १४ गावांमध्ये सुरू होणार प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार-स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि मनुष्यबळाला कौशल्यपूर्ण बनविणे यासाठी राज्यात प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यात आली आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १४ केंद्रांचा समावेश आहे. याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे गुरुवारी (दि. १९) दुपारी ४ वाजता होणार आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात कार्यक्रम पूर्वतयारी बैठक झाली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी या कार्यक्रमात जास्तीत जास्त युवकांना सहभागी करून घेण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातील सहाय्यक आयुक्त अमिता पवार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी व विविध शासकीय अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

PMKUVA
प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजगता विकास अभियान

रायगड जिल्ह्यात एकूण १४ ग्रामपंचायतीच्या ठिकाणी ही केंद्र उभारली जाणार आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यातील चेंढरे, रोह्यातील धाटाव, पनवेलमधील करंजाडे, उरणमधील फुंडे, पोलादपुरातील तुर्भे बुद्रुक, पेणमधील वडखळ, सुधागडातील जांभुळपाडा, मुरूडमधील नांदगाव, तळा तालुक्यातील मजगाव, महाडमधील शिरवली, माणगावमधील रातवड, खालापुरातील नारंगी, श्रीवर्धनमधील दिघी आणि म्हसळा तालुक्यातील खरसई या ग्रामपंचायतीच्या ठिकाणांचा समावेश आहे. या सर्व कौशल्य केंद्रांवर पुढील तीन वर्षांच्या कालावधीत १८ ते ४५ वयोगटातील व्यक्तींसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत मोफत कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहेत.

## शेकाप, शिवसेना कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : न्हावा ग्रामपंचायतीच्या रणधुमाळीत शेकापचे हनुमान पांडुरंग भोईर व नैविन हनुमान भोईर तसेच शिवसेनेचे विजेंद्र पाटील व जगदीश सदाशिव म्हात्रे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, चंद्रकांत भोईर, गाव अध्यक्ष तुषार भोईर, महेश कडू, शरद खारकर, चंद्रकांत पाटील, सागर ठाकूर, जॉर्ज मिनिजियस, दीपक भोईर, विनोद पाटील, रूपेश घरत, मोरेश्वर पाटील, चंद्रकांत आत्माराम पाटील, दर्शन ठाकूर, मीनाक्षी पाटील, रंजना घरत, सुशीला पाटील, कमलाबाई म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अर्ज सादरीकरणाच्या वेळेत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांसाठी उर्वरित कालावधीत म्हणजे २० ऑक्टोबरपर्यंत नामनिर्देशनपत्र सादर करण्याची वेळ दुपारी ३ऐवजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे, असे राज्य निवडणूक आयोगाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रे १६ ते २० ऑक्टोबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत दाखल करण्याची मुदत देण्यात आली होती. नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे घोषणापत्र संगणक प्रणालीद्वारे भरले जात होते, मात्र त्याची प्रिंट काढताना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी आयोगाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अडचणी आता दूर करण्यात आल्या आहेत. नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या उर्वरित २० ऑक्टोबर या कालावधीतील मुदत सकाळी ११ ते दुपारी ३ऐवजी आता सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० अशी करण्यात आली आहे. अन्य प्रक्रिया पूर्वघोषित कार्यक्रमाप्रमाणे होईल.



**नवी मुंबई : महाविजय २०२४ अंतर्गत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे नवी मुंबईतील संघटनात्मक दौऱ्यादरम्यान विविध समाजातील नागरिकांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वागत केले. या वेळी माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, आमदार सर्वश्री संजय केळकर, गणेश नाईक, मंदा म्हात्रे, रमेश पाटील, भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक आदी उपस्थित होते.**

## महाविजय २०२४ : भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज अलिबागमध्ये

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाविजय २०२४च्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बुधवारी (दि. १८) अलिबाग दौऱ्यावर येणार असल्याची माहिती पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते व उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी यांनी दिली.

भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीकरिता संपूर्ण देशभरात महाविजय २०२४ अंतर्गत लोकसभा मतदारसंघाची बांधणी सुरू आहे. आगामी निवडणुकीसाठी भाजपचे राष्ट्रीय पातळीवर ४०० प्लस, तर महाराष्ट्र राज्यात ४५ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदारसंघात प्रवास सुरू आहे. त्यातील एक भाग असलेल्या रायगड लोकसभा मतदारसंघात बुधवारी त्यांचा दौरा होणार असून या दौऱ्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, असे अ‍ॅड. मोहिते यांनी सांगितले.

पक्षाची माहिती, ध्येय धोरणे बूथमधील शेवटच्या नागरिकांपर्यंत माहिती व्हावी याकरिता एका प्रमुख पदाधिकाऱ्याकडे विधानसभा मतदारसंघातील तीन ते चार बूथची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली असून पक्षाने त्यांना विधानसभा वॉरियर्स म्हणून संबोधले आहे. अशा रायगड लोकसभा मतदारसंघातील विधानसभा वॉरियर्सची बैठक स्वतः प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे वरसोली होरीझन हॉल येथे सकाळी १० वाजता घेणार आहेत. तत्पूर्वी ते झिराड येथील तलाठी कार्यालय लोकार्पण सोहळ्यास ते उपस्थिती लावणार आहेत.

अलिबाग शहरात दुपारी १२ वाजता घर घर चलो अभियान व माझी माती, माझा देश अभियान राबविण्यात येणार आहे. या घर घर चलो संपर्क अभियानात प्रदेशाध्यक्षांसोबत चारही विधानसभेतील हजारो कार्यकर्ते त्यांच्याबरोबर सहभागी होणार आहेत. त्यानंतर ते अलिबागमधील काही परिवारांच्या भेटी घेणार असून त्यानंतर होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील कॉर्नर बैठकीत ते कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधणार आहेत. याचदरम्यान शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास तसेच सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या स्मारकास अभिवादन करणार आहेत.

देशाच्या प्रगतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्णय घेतले, लोकहिताच्या विविध योजना अमलात आणल्या त्याची माहिती देण्यासाठी घर घर चलो संपर्क अभियान सुरू आहे. त्या अनुषंगाने दुपारी ३ वाजता रायगड लोकसभा मतदारसंघांतील अलिबाग, पेण, श्रीवर्धन आणि महाड या चारही विधानसभा मतदारसंघांतील वॉरियसची बैठक होईल. प्रदेशाध्यक्षांच्या या संघटनात्मक दौऱ्याची अलिबागमध्ये जोरदार तयारी केली असल्याचेही अ‍ॅड. महेश मोहिते व दिलीप भोईर यांनी सांगितले.

## निवडक

### समलिंगी विवाहाची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली :** समलिंगी विवाहाला मान्यता देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १७) फेटाळून लावली. या वर्षी २० मे रोजीच न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी पूर्ण केली होती, मात्र निकाल राखून ठेवला होता. तीन विरुद्ध दोन मतांनी ही याचिका फेटाळली. दरम्यान, या संदर्भात निर्णय घेण्यास राज्यांना मुभा आहे.

### आमदार अपात्रतेसंदर्भात ३० ऑक्टोबरला सुनावणी

**नवी दिल्ली :** आमदार अपात्रतेसंदर्भात मंगळवारी (दि. १७) सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या वकिलांनी मागितलेल्या मुदतीमुळे कोर्टाने पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला घेणार असल्याचे सांगितले. दरम्यान विधानसभा अध्यक्षांसोबत बसून वेळापत्रक देऊ, असे त्यांच्या वकिलांनी या वेळी कोर्टात सांगितले.

## करंजा-रेवस खाडीपुलासाठी हालचाली

### एमएमआरडीएकडून डीपीआर बनवण्याचे काम सुरू

**उरण : प्रतिनिधी**

प्रस्तावित २.४ किमी लांबीचा करंजा-रेवस खाडीपूल उभारण्याच्या हालचाली पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. या प्रकल्पाचा खर्च आता ९०० कोटींपर्यंत पोहचला आहे. एमएमआरडीएने या कामासाठी डेव्हलपमेंट प्लॅन रिसर्च (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू केले असल्याची माहिती उपअभियंता अनिरुद्ध बोराडे यांनी दिली.

करंजा आणि रेवस ही दोन्ही बंदरे या खाडीपुलाच्या रस्त्याने जोडली जाणार आहेत. नवी मुंबई-अलिबागदरम्यानचे सुमारे २० किमी अंतर कमी होण्यासाठीही या खाडीपुलामुळे मदत मिळणार आहे. दोन्ही बंदरांना जोडणाऱ्या या पुलामुळे रायगड आणि कोकणात पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांना पनवेल, पेण या मार्गाचा वळसा न घालता नवी मुंबईहून उरणच्या करंजा येथून थेट अलिबागला जाता येणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ, इंधन आणि अतिरिक्त पैसे वाचण्यास मदत होईलच. शिवाय वाहतूक कोंडीअभावी प्रवासही जलद होणार आहे. अनेक वर्षांपासून समुद्रातून धोकादायक प्रवासावर अवलंबून असलेल्या उरण, अलिबागच्याच नव्हे; रायगडमधील हजारो नागरिकांना रस्त्याने प्रवास करता येणार आहे.



## शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील निवडणूक आयोगाच्या निकालाविरोधातील सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली आहे. ३१ ऑक्टोबरला होणारी ही सुनावणी आता दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह वापरण्याचा अधिकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला. त्यानंतर ठाकरे गटाकडून सुप्रीम कोर्टात निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. पहिल्यांदाच या याचिकेवर सुनावणी होणार होती, मात्र ही सुनावणी लांबणीवर गेली असून तीन आठवड्यांनंतर होणार आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे राष्ट्रीय स्पेल क्रेस्ट स्पर्धेत सुयश

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील दोन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावरील स्पेल क्रेस्ट (शब्दलेखन शोध) स्पर्धेत सुयश मिळवले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुक केले.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील इयत्ता तिसरी ‘ए’मध्ये शिकणारी प्रस्मिता दाशने राष्ट्रीय स्तरावर द्वितीय, तर दुसरी ‘सी’तील अनन्या झा हिने राज्यस्तरावर पहिला आणि राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक मिळवला. या दोघींना ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि पदक देऊन गौरविण्यात आले. त्यांचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मुख्याध्यापक राज अलोनी यांनी अभिनंदन केले.




# रायगडात रस्ते अपघात घटले आणि मृत्यूचे प्रमाण वाढले!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात रस्ते अपघातांची संख्या घटली आहे, पण अपघातांमध्ये मृत्यूचे होण्याचे प्रमाण वाढले आहे. जिल्ह्यात जानेवारी ते सप्टेंबर २०२३ अखेरपर्यंतच्या नऊ महिन्यांच्या कालावधीत विविध मार्गांवर ५१६ अपघातांची नोंद झाली. यात २१८ जणांचा मृत्यू झाला आहे.

मागील नऊ महिन्यांत मुंबई-गोवा महामार्गावर १४५ अपघात झाले. यात ६० जणांचा मृत्यू झाला, तर १५७ जण गंभीर जखमी झाले. मुंबई-पुणे महामार्गावर ५३ अपघातांची नोंद झाली. यात २४ जणांचा मृत्यू झाला, तर ५३ जण गंभीररीत्या जखमी झाले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ५९ अपघात नोंदविले गेले. यात १८ जणांचा मृत्यू, तर १० जण गंभीर जखमी झाले.

वडखळ-अलिबाग महामार्गावर १९ अपघात झाले, ज्यात पाच जणांचा मृत्यू झाला. पेण-खोपोली महामार्गावर आठ अपघातात नऊ जण दगावले. खोपोली-वाकण महामार्गावर तीन अपघातांत एकाचा मृत्यू झाला.




दिघी-माणगाव महामार्गावर १५ अपघातांत पाच जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील राज्यमार्गांवर १०३ अपघातांची नोंद झाली, ज्यात ५४ जणांचा मृत्यू झाला. जिल्हा मार्गांवर १११ अपघातांची नोंद झाली. यात ४२ जणांना मृत्यू झाला.

> **रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी आम्ही बेदरकारपणे वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई केली. त्याचबरोबर वाहनचालकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती केली. यामुळे रस्ते अपघातांचे प्रमाण कमी झाले.**
> **-अनिल लाड, पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, रायगड**

अरुंद रस्ता, नागमोडी वळणे, वाहनचालकांचा बेदरकारपणा, लेनची शिस्त न पाळणे, वेगमर्यादा ओलांडणे, गाडांचे टायर फुटणे, दारू पिऊन गाडी चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेकींग करणे, अरुंद रस्त्यांवर वाढलेली अवजड वाहतूक यामुळे अपघात होत आहेत. चालकांनी स्वत:सह प्रवाशांची काळजी घेऊन वाहन चालविण्याचे आवाहन आहे.

# सागरी व्यापारातील गुंतवणूकदारांना भारतात मोठी संधी -पंतप्रधान मोदी

## तिसऱ्या ग्लोबल मेरीटाइम इंडिया समिटचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे भारताची वाटचाल सुरू आहे. सागरी व्यापाराचा यात मोठा वाटा असणार आहे. बंदरे, जहाजबांधणी क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदारासाठी भारतात गुंतवणूक करण्याची मोठी संधी आहे. येत्या काळात सागरी व्यापार क्षेत्रातही आघाडीचा देश म्हणून भारताचे नाव घेतले जाईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे तिसऱ्या ग्लोबल मेरीटाइम इंडिया समोर २०२३चे उद्घाटन मंगळवारी (दि. १७) करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. मुंबईतील एमएमआरडीए मैदानावर सुरू झालेली ही परिषद १९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. या वेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय बंदर व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, 'फिक्की'चे अध्यक्ष सुभ्रकांत पांडा तसेच विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी राज्याचे बंदरे मंत्री संजय बनसोडे आणि शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची उपस्थिती होती.



या सोहळ्यात प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते भारतीय सागरी नील अर्थव्यवस्थेसाठीच्या दीर्घकालीन ब्लू प्रिंटचे अर्थात अमृतकाल व्हीजन २०४७चे अनावरण करण्यात आले. या ब्लू प्रिंटमध्ये बंदरांमधील सेवासुविधा वाढवण्यासह, शाश्वत पद्धतींना चालना आणि आंतरराष्ट्रीय सहयोग वृद्धी याविषयी विविध धोरणात्मक उपाययोजनांचा समावेश आहे. या वेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते २३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ करण्यात आली.

यात गुजरातमधील दीनदयाल बंदर प्राधिकरण येथे चार हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या टुना टेक्रा ऑल-वेदर डीप ड्राफ्ट टर्मिनलच्या कोनशिलेचे अनावरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. सागरी क्षेत्रात जागतिक आणि राष्ट्रीय भागिदारीसंदर्भात झालेले सात लाख कोटींहून अधिक किमतीचे ३००हून अधिक सामंजस्य करार देखील करण्यात आले.

### बंदरे विकासाला वेग -मुख्यमंत्री

*आगामी काळात बंदरांवर हायड्रोजन हबची स्थापना, एलएनजी बंकरिंग, यासारख्या सुविधांमुळे राज्यातील बंदरे विकास एका उंचीवर जाईल. रेल्वे, समुद्र आणि जलमार्ग यांना एकत्रित करणारी मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी विकसित करण्यावर आमचे लक्ष आहे. पीएम गति शक्ती योजनेत लॉजिस्टिक कार्यक्षमता आणि कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. राज्याला लाभलेला ७२० किमीचा समुद्रकिनारा, दोन प्रमुख बंदरे, १४पेक्षा जास्त मोठी आणि मध्यवर्ती बंदरे आणि असंख्य खाड्या या सर्व गोष्टी भारताच्या सागरी व्यापार वाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात मालवाहतुकीच्या प्रमाणात उल्लेखनीय वाढ झाली असून प्रवासी वाहतूक सेवेसाठी नवीन मार्ग सुरू केले आहेत. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बंदरांपैकी आणि टॉप ३० जागतिक बंदरांपैकी एक असून मुंबई पोर्ट थॉरिटी जगभरातील सर्वोत्तम परंतु सर्वात कमी क्रूझ टॅरिफ देते.*

राज्यपाल बैस म्हणाले की, महाराष्ट्राला सागरी इतिहास आहे. मुंबई हे आर्थिक केंद्र होण्यामध्ये येथील सागरी व्यापाराचा मोठा वाटा आहे. अर्थव्यवस्थेत बंदरे आणि जहाजबांधणी क्षेत्राचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षा या घटकांकडे लक्ष देत सहभागी राष्ट्रांनी व्यापारी आदानप्रदान वाढविण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. या वेळी मुंबई पोर्ट ट्रस्टला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एका टपाल तिकिटाचे आणि प्रोपेलिंग इंडियास मेरिटाईम व्हिजन या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

## रायगडात जलजीवन मिशन अंतर्गत ९५ योजनांची कामे पूर्ण





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ९५ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, तर ७४ योजनांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊन, घराघरात नळ कनेक्शन दिल्याने ग्रामीण भागातील महिलांना पाण्यासाठी करावी लागणारी वणवण थांबली आहे. यामुळे श्रम व वेळ वाचत असल्याची प्रतिक्रिया ग्रामीण भागातील महिला व्यक्त करीत आहेत.

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४पर्यंत हर घर नल से जल या योजनेमधून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी रायगड जिल्हा परिषदेने चांगलीच कंबर कसली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कार्यारंभ आदेश देऊनही एक वर्षांचा कालावधी उलटूनही काम सुरू न करणाऱ्या ठेकेदारांवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. १४ ठेकेदारांना एक वर्षांसाठी काळ्या यादीत टाकून, त्यांच्याकडून २६ कामे काढून घेण्यात आली आहेत.

या २६ कामांची फेरनिविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त सुरू असलेल्या योजनांची कामे गुणवत्तापूर्वक पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाच्या माध्यमातून नियमित योजनानिहाय कामांची माहिती घेण्यात येत आहे. अधिकारी कामांना भेटी देऊन कामाची पाहणी करीत आहेत. निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

**जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली पाणीपुरवठा योजनांची कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी सूचना ठेकेदार, अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. योजनांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलण्यात येत आहेत.**

**-डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

**आमच्या गावात पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन आमच्या घरात नळ कनेक्शन देण्यात आले आहे. यापूर्वी आम्हाला गावातील विहिरीवरून तसेच सार्वजनिक नळावरुन पाणी भरावे लागत होते, मात्र आत्ता आमचे हे श्रम वाचले आहेत.**

**-सुहासिनी आठवले, रहिवासी महिला**

**आमच्या घरात नळ कनेक्शन देण्यात आले आहे. दररोज नळाला पाणी येत आहे. यापूर्वी गावातील सार्वजनिक नळावरून पाणी भरावे लागत होते. यामुळे नळावर नंबर लाऊन, नंबर येईपर्यंत वाट पाहावी लागत होती. यामुळे खूप वेळ वाया जात होता, मात्र आत्ता घरात नळ असल्याने हा वेळ वाचत आहे.**

**-मंजुळा आंबाडे, रहिवासी महिला**

### तालुकानिहाय पूर्ण झालेल्या योजना

***९५ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत. यामध्ये अलिबाग आठ, कर्जत चार, महाड चार, माणगाव ११, म्हसळा सहा, मुरूड सात, पनवेल एक, पेण नऊ, पोलादपूर १२, रोहा आठ, श्रीवर्धन ११, सुधागड १०, तळा तीन, उरण एक यांचा समावेश आहे.***

## ओबीसी आरक्षणाबाबत केंद्रीय आयोगापुढे मुंबईत सुनावणी

**रोहे : प्रतिनिधी**

सह्याद्री विश्रामगृह मुंबई येथे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग नवी दिल्लीचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखाली शिवा संघटनेच्या ओबीसी आरक्षणाबाबत मंगळवारी (दि. १७) सुनावणी झाली.

या सुनावणीत वीरशैव-लिंगायत या समाजातील लिंगायत वाणी जातीसह एकूण १५ उपजातीचा केंद्रीय ओबीसी लिस्ट मध्ये समावेश करण्यासाठी प्रा. मनोहर धोंडे यांनी आयोगापुढे मांडणी केली. या सुनावणीत केंद्रीय ओबीसी आयोगाचे प्रधान सचिव राजीव रंजन, सदस्य भुवन भूषण कमल, केंद्रीय आयोगाचे राजेश कुमार, राज्य शासनाचे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, राज्य शासनाचे इतर मागास वर्ग विभागाचे प्रधान सचिव वीरेंद्र सिंह, सहसचिव दिनेश डिंगळे, उपसचिव श्री झाल्टे, राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य ॲड. बी. एल. सगर किल्लारीकर, निवृत्त न्यायमूर्ती चंद्रालाल मेश्राम, ज्योतीराम चव्हाण, सदस्य सचिव आ. उ. पाटील यांच्या सह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या सुनावणीत वीरशैव लिंगायत समाजातील एकूण १५ जातींचा केंद्रीय ओबीसी लिस्टमध्ये समावेश करण्यासाठी शिवा संघटनेकडून बाजू मांडण्यात आली. ज्या उपजातींचा समावेश करण्यासाठी मांडणी करण्यात आली. त्या उपजाती लिंगायात वाणी, लिंगायत जंगम, लिंगायत गुरव, लिंगायत तांबोळी, लिंगायत कुंभार, लिंगायत न्हावी, लिंगायत परीट, लिंगायत धोबी, लिंगायत फुलारी, लिंगायत सुतार, लिंगायत कुल्लेकडगी, लिंगायत कोष्टी, लिंगायत देवांग व लिंगायत साळी या उपजातींचा समावेश करण्यात येणार आहे.

या वेळी शिवा संघटनाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांच्यासह राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेट्टे, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. वाय. बी सोनटक्के, राज्य सरचिटणीस धन्याकुमार शिवणकर, राज्यसरचिटणीस रुपेश होनराव, राज्य उपाध्यक्ष सुनील वाडकर, राज्य मुख्य संघटक नारायण कंकनवाडी, ठाणे जिल्हाध्यक्ष शिवा बिराजदार, पालघर जिल्हाध्यक्ष शांतेश्वर गुमते, लोहा (नांदेड) तालुकाध्यक्ष हनुमंत लांडगे, पुणे शहर सचिव गौरव तक्ते, सरपंच बसवेश्वर धोंडे, सरपंच दामोदर वाके यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

## 'भारतात ऑलिम्पिक झाल्यास फ्रान्स सहकार्य करणार'

**मुंबई** : भारतात ऑलिम्पिक स्पर्धा झाल्यास फ्रान्स आपल्या अनुभवाचा लाभ भारताला करून देईल, असे प्रतिपादन फ्रान्सचे वाणिज्यदूत ज्यां मार्क सेर- शार्ले यांनी येथे केले.

ज्यां मार्क सेर-शार्ले यांनी सोमवारी (दि. १७) राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी फ्रान्सचे मुंबईतील उपवाणिज्यदूत सॅमी बुआकाझे उपस्थित होते. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी विद्यापीठांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे तसेच फ्रान्समध्ये शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचे सूचित केल्याचे त्यांनी राज्यपालांना सांगितले. या दृष्टीने आपण महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांना भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठांनी आपल्यास्तरावर दीर्घकालीन संबंध प्रस्थापित करावे, असेही आपणांस सूचित करण्यात आले असून विद्यार्थ्यांकडे फ्रान्समधील विद्यापीठाची पदवी असेल, तर त्यांना विशेष व्हिजा देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## आपला दवाखाना लाभार्थींची संख्या २३ लाखांवर; नागरिकांचा वाढता प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू होऊन वर्ष झाले असून या वर्षभरामध्ये आपला दवाखानाच्या माध्यमातून तब्बल २३ लाख नागरिकांनी लाभ घेतला आहे. पुढील काही दिवसांमध्ये आपला दवाखानाची संख्याही वाढविण्यात येणार असल्याने या वर्षाअखेरपर्यंत लाभार्थ्यांचीही संख्या ३० लाखांचा टप्पा ओलांडण्याची शक्यता आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध १९४ ठिकाणी आपला दवाखाने कार्यरत आहेत. यातील २८ ठिकाणी पॉलीक्लिनिक, तर १६६ ठिकाणी दवाखाने आहेत. यानुसार १९४ ठिकाणी मोफत वैद्यकीय तपासणी व मोफत औषधोपचार उपलब्ध असून आतापर्यंत तब्बल २३ लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी या दवाखान्यांचा लाभ घेतला आहे.

आपला दवाखानामध्ये मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार यासह रक्त चाचण्यांची सेवा मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचबरोबर विशेष तज्ज्ञांच्या सेवाही पॉलीक्लिनिक व डायग्नॉस्टिक सेंटरद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## शालेय पोषण आहारासंबंधी नवीन पनवेल येथे सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग व तालुका मुख्याध्यापक संघाच्या संयुक्त विद्यमानाने बांठिया हायस्कूल नवीन पनवेल येथे शालेय पोषण आहारासंबंधी पनवेल तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांची सहविचार सभा झाली.

या सभेत गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांनी, यू डायस प्लस, स्टुडंट पोर्टल, आधार अपडेट व नियतकालिक मूल्यांकन चाचणी, राज्य शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण याचा सविस्तर आढावा घेतला तसेच पनवेल तालुका शालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे यांनी, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनांतर्गत मध्यान्ह भोजन योजनेबद्दल सविस्तर माहिती देऊन कामाचा आढावा घेतला. अक्षय पात्र योजनेंतर्गत समाविष्ठ शाळांना करार पत्राबाबत सूचना दिल्या.

सभेत पंचायत समितीच्या प्रतिमा म्हात्रे तसेच शिक्षक समीर सैय्यद यांनीदेखील शाळांच्या ऑनलाईन कामासंदर्भात मार्गदर्शन करून मुख्याध्यापकांच्या शंकांचे निरसन केले. सभेच्या शेवटी पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत यांनी उपस्थितांचे आभार मानले.




## मीरा बोरवणकरांच्या आरोपांचे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून खंडन

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे पोलिसांच्या येरवडा येथील तीन एकर जमिनीचा २०१०मध्ये विभागीय आयुक्तांनी लिलाव केला होता. तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी ही जमीन हस्तांतरित करण्याचा आदेश दिला होता, मात्र आपण त्याला नकार दिला, असा दावा माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांनी नाव न घेता त्यांच्या 'मॅडम कमिशनर' या आत्मचरित्रात केला आहे. या आरोपांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी (दि. १७) पत्रकार परिषद घेऊन सविस्तर उत्तर दिले.



या वेळी त्यांनी बोरवणकरांचे आरोप मुद्देसूदपणे खोडून काढले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, माझं काम भलं आणि मी भला असे करीत मी पुढे जात असतो. गेले तीन-चार दिवस सातत्याने माध्यमांत बातम्या आल्या. मी त्या बातम्यांना जास्त महत्त्व दिले नाही. त्या बातम्यांशी माझा दुरान्वये संबंध नाही. अनेक वर्षे पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. अपवाद मी सरकारमध्ये नव्हतो तो काळ होता. ज्या जिल्ह्याची माझ्यावर जबाबदारी असते त्या जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न मार्गी लावावे असा माझा प्रयत्न असतो. पालकमंत्री या नात्याने आढावा बैठका घेतो. कामाला कशी गती देता येईल, काही समस्या असतील तर सोडवता कसे येतील याचा प्रयत्न असतो. एखादे काम होत नसेल तर ते का अडलेले आहे यासाठी विविध विभागातील आढावा घेतो. म्हणून पुण्यातही मी आढाला बैठका घेत असतो. आता एका रिटायर्ड आयपीएस ऑफिसरने पुस्तक लिहिले व त्या पुस्तकातून सातत्याने काहीतरी बातम्या येऊ लागल्या की अजित पवार अडचणीत, पण मी काहीही केले नाही. चौकशी करा. या वेळी त्यांनी २००८पासून या संदर्भात झालेल्या बैठकांचेही इतिवृत्त पत्रकारांना वाचून दाखविले.

## विजयभूमी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात

### पद्मश्री शुभा मुद्गल यांची प्रमुख उपस्थिती

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील जांबरूग परिसरातील विजयभूमी विद्यापीठांमध्ये दीक्षांत समारंभ उत्साहात झाला. या वेळी पद्मश्री शुभा मुद्गल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून सुनील रोहोकाळे, विद्यापीठाचे अध्यक्ष संजय पडोदे, कुलगुरू डॉ. अतिश चट्टोपाध्याय आदी उपस्थित होते.



या वेळी सहा विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ म्युझिक तर चार विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी देण्यात आली. १२ विद्यार्थ्यांना मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन ही पदवी देण्यात आली. अशा प्रकारे एकूण २२ विद्यार्थ्यांना विजयभूमी विद्यापीठाकडून डिग्री देण्यात आली.

समारंभासाठी प्रशासकीय कुलगुरू डॉ. अश्विनीकुमार शर्मा, प्रो. व्हाईस चान्सलर अनिल पैला, डॉ. नंदिश हिरेमठ, सदस्य मनोज शहा, डॉ. व्ही. शास्त्री, कल्पना पडोदे, प्रणव पडोदे, डॉ. शालिनी कालिया, डॉ. प्रशिल सूर्यवंशी, डॉ. आनंद देव जेम्स, प्रा. निलेश थॉमस, एडमिन हेड कर्नल संजय दत्ता, राजु पूजारी, अतुल झोपे, भूषण पिंपळकर आदी उपस्थित होते.

## उरण कळंबुसरेत जुगार अड्ड्यावर धाड

### १३ जणांना अटक; दीड लाखांची रोकड जप्त

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील कळंबुसरे गावात नवरात्रोत्सवामध्ये तीन पत्त्यांचा डाव मांडून जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांनी धाड टाकली आणि १३ जुगाऱ्यांना अटक केली. त्यांच्याकडून रोख एक लाख ४८ हजार ४९० रुपये जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती उरण पोलीस निरीक्षक सतिश निकम यांनी दिली.

नवरात्रोत्सवात कळंबुसरे गावात जुगाराचा डाव खेळला जात असल्याची कुणकुण पोलिसांना लागली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कांबळे, सहाय्यक निरीक्षक गणेश शिंदे यांच्या मदतीने धाड टाकली.

या धाडीत संतोष राऊत, देवेंद्र पाटील, धर्मेंद्र ठाकूर, संतोष गावंड, दिलीप पाटील, सागर म्हात्रे, विनायक गावंड, विश्वनाथ पाटील, संजोग ठाकूर, अम्मत केणी, सुजय गायधर, समाधान ठाकूर, दीपक चव्हाण या १३ जुगाऱ्यांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून एक लाख ४८ हजार ४९० रुपये रोकड जप्त करण्यात आली.

# जबरी चोरीप्रकरणी टोळ्या गजाआड

## पनवेल पोलिसांकडून महामार्गावरील चोरीचा छडा

**पनवेल : वार्ताहर**

अवघ्या १५ दिवसांत पनवेल परिसरातील एक्सप्रेस महामार्गावर जबरी चोरी करणाऱ्या दोन वेगवगेळ्या टोळ्यांना पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केल्याने वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



पनवेलजवळील पुणे-मुंबई एक्सप्रेस वे वरील जेएनपीटी पनवेल एक्झिट येथे लघुशंकेसाठी थांबलेल्या ट्रक चालकासह त्याच्या भावाला अज्ञात त्रिकुटाने मारहाण करून लुटल्याची घटना चार दिवसांपूर्वी घडली होती. त्यामध्ये ट्रक चालक असीर मो. बशीर खान (वय ५१) हा त्याचा भाऊ हे त्यांच्या ताब्यातील ट्रक (एमएच-४३-वाय-७१२३) हे पुणे-मुंबई एक्सप्रेस वे वरील जेएनपीटी पनवेल एक्झिट येथे थांबून लघुशंकेकरिता गेले असता तीन अनोळखी व्यक्तींनी संगनमत करून त्यांना धक्काबुक्की व हाताने मारहाण करून त्याच्या भावाकडून व त्यांच्या ट्रकमधून रोख रक्कमेसह मोबाईल फोन असा मिळून जवळपास १५ हजार रुपये किंमतीचा ऐवज जबरीने चोरुन ते पसार झाले होते.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यातक्रारी नुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, हवालदार महेश धुमाळ, विजय देवरे, सुनील कुदळे, शिपाई आकाश भगत आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपींचा शोध घेतला. यामध्ये आरोपी स्वप्नील वाघमारे (रा. ढोणे वाडी), प्रवीण पवार (वय २०, रा. ढोणे वाडी) व एक विधिविसर्ग बालक हे तिघेजण या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असून ते ढोणेवाडी परिसरात लपले असल्याची माहिती या पथकाला मिळताच त्यांनी सापळा रचून या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन असा १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या गुन्ह्यात वापरलेल्या मोटरसायकली, वेगवगेळ्या कंपनीचे मोबाईल फोन असा एकूण तीन लाख ३२ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. या पूर्वीसुद्धा त्यांनी असे गुन्हे केले आहेत का याचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

दरम्यान, मागील १५ दिवसांपूर्वीसुद्धा अश्याच प्रकारे महामार्गावर लूटमार करणाऱ्या एका टोळीला याच पथकाने ताब्यात घेतले होते. अवघ्या १५ दिवसांत पनवेल तालुका पोलिसांनी दोन टोळ्या जेरबंद केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# कर्नाळा अभयारण्यात ध्वनिरोधक यंत्रणा चोरणारे संशयित ताब्यात





**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या कर्नाळा अभयारण्याच्या परिसरातील महामार्गावरच्या दुतर्फा नॉइस बॅरिअर्स (ध्वनिरोधक) यंत्रणा बसवण्यात आली आहे. या यंत्रणेची चोरी एका टोळीने केली होती. या टोळीला रंगेहाथ पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्याचे काम कर्नाळा अभयारण्यातील वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केले. या प्रकरणी तीन संशयित आरोपींना पकडण्यात वन अधिकाऱ्यांना यश आले आहे.

नॉइस बॅरिअर्स (ध्वनिरोधक) यंत्रणेमुळे अभयारण्यात वाहनांचा आवाज जात नाही, तर आवाजाची पातळी कमी करण्याची क्षमता या यंत्रणेत आहे. जवळपास १ ते २ किमी अंतरापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा हे हिरव्या रंगाची यंत्रणा असलेले पत्रे लावण्यात आले आहेत.

सोमवारी रात्री, पहाटे या पत्र्यांची चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या टोळीला रंगे हात पकडण्याचे धाडसी काम अभयारण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी केले आहे. अभयराण्यातील वन रक्षक डी. डी. कांबळे, खानसाम अरुण वेळे, रखवालदार देविदास किलजे, मनोहर कानडे, दत्तात्रेय सळूखे हे अभयारण्यात रात्री गस्तीला होते, रात्र गस्त घालत असताना रस्त्याच्या बाजूला पत्र्याचा आवाज येऊ लागला होता, पत्र्याचा आवाज कसला येतो आहे, म्हणून कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर जाऊन पाहणी केली असता, काही अज्ञात व्यक्ती हे रस्त्याच्या शेजारी लावलेले पत्रे काढत असल्याचे दिसून येत होते.

याचवेळी या कर्मचाऱ्यांनी न घाबरता पळत जाऊन या चोरांना अटक केली, मात्र अंधार असल्याने या टोळीतील दोन ते तीन चोर अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले, मात्र तीन संशयीत आरोपींना पकडण्यात वन कर्मचाऱ्यांना यश आले आहे. या संशयीत आरोपींच्या टोळीने काही पत्रेदेखील काढून रस्त्याच्या बाजूला ठेवलेले मिळून आले. या आरोपींना पकडल्यानंतर या चोरीची माहिती वन कर्मचाऱ्यांनी पनवेल तालुका पोलिसांना दिली आणि या संशयीत आरोपींना पोलिसांच्या स्वाधीन केले. त्या मुळे या वन अधिकाऱ्यांचे कौतुक होत आहे. पत्रे काढण्यासाठी लोखंडी पार, लोखंडी रॉड आणि कटरचा वापर करून हे पत्रे, आरोपी काढत होते, या आरोपींना पकडल्यानंतर हे साहित्य पोलिसांकडे जमा केले आहे.

# भाजप खारघर मंडल कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या आदेशानुसार तसेच खारघर मंडल संपर्क प्रमुख दीपक बेहेरे यांच्या सूचनेनुसार खारघर शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी खारघर मंडल कार्यकारिणी जाहीर केली आहे.

खारघर शहर मंडल सरचिटणीसपदी दीपक शिंदे, ॲड. नरेश ठाकूर; उपाध्यक्षपदी रमेश खडकर, गुरुनाथ गायकर, विनोद घरत, सचिन वासकर, संजय घरत, किरण पाटील; चिटणीसपदी निलम विसपुते, अनिता जाधव, अनिल साबणे, शैलेंद्र त्रिपाठी, शोभा मिश्रा, तुकाराम कंटाले आणि कोषाध्यक्षपदी निर्मला यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# 'बीसीटी'तर्फे मानवी तस्करीविरोधातील लढाईसाठी जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातर्फे 'मानवी तस्करी'बाबत जागृतकता अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांच्या 'वॉक फॉर फ्रीडम' रॅली आयोजित करण्यात आली होती.





या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या सानवी देशमुख मार्गदर्शन करताना म्हणाल्या की,, गेल्या दशकापासून, मानवी तस्करी हा जगातील संघटित गुन्हेगारीचा सर्वांत वेगाने वाढणारा प्रकार बनत आहे. याबाबत, जमसमान्यांमध्ये जागृती होणे आवश्यक असून मानवी तस्करी कायमस्वरूपी बंद करण्याच्या विरोधातील लढाईला न्यायिक बळ देणे आवश्यक आहे. विधी विद्यार्थी आणि विधी क्षेत्रातील कायदेतज्ज्ञांची एकप्रकारे सामाजिक जबाबदारी आहे.

रॅलीत सुमारे २२२ विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग दर्शविला. तर, सीकेटी महाविद्यालयाचे प्रोफेसर एस.एन. परकाळे यांनी, मानवी तस्करीविरुद्ध विद्यार्थ्यांची ही एकजूट या झोपलेल्या समाजाला जागे करेल मत व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी एन एस एस मुख्य कार्यक्रम अधिकारी राघव शर्मा आनी एन एस एस कार्यक्रम अधिकारी क्रांति भोवते यांच्या मार्गदर्शनाखाली बी.सी.टी. महाविद्यालयातील एल.एल.बी. आणि बी.एल.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या एकत्रित कोअर टीमचे विशेष सहकार्य लाभले. विधी महाविद्यालयातील इतर सहाय्यक प्राध्यापक व शिक्षकोत्तर कर्मचारी इत्यादींनीही सक्रिय सहभाग दाखवला.

या जनजागृती रॅलीची बीसीटी विधी महाविद्यालयापासून सुरुवात होवून खांदा कॉलनीतील अंतर्गत भागातून सुमारे पाच किलोमीटरचे अंतर चालून पुन्हा महाविद्यालयाच्या ठिकाणी अंतिम करण्यात आली. रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी मानवी तस्करीच्या विरोधात आणि ती कायमस्वरूपी रोखण्यासाठीच्या जनजागृतीबाबत घोषणाबाजी केली.

## निवडक

### नोकरी देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल :** पार्ट टाइम नोकरीच्या बहाण्याने तरुणाची दोन लाख ८१ हजारांची फसवणूक झाली आहे. टास्क पूर्ण करून अधिकाधिक नफा कमवायचे आमिष दाखवून हा प्रकार घडला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथे राहणाऱ्या सुमित नारवाणी याच्यासोबत हा प्रकार घडला आहे. या तरुणाला मोबाइलवर पार्ट टाइम नोकरीतून पैसे कमविण्याचा मेसेज आला होता. त्या मेसेजला रिप्लाय दिला असता त्याला टेलिग्राम ग्रुपमध्ये घेऊन टास्क देण्यात आले होते. त्यामध्ये जेवढी मोठी गुंतवणूक तेवढा अधिक नफा मिळेल असे आमिष त्याला दाखविण्यात आले. त्या आमिषाला भुलून सुमित याने सुमारे २ लाख ८१ हजार रुपये भरले होते, मात्र पैसे भरूनही नफा मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्याला आपली फसवणूक झाल्याचे समजले. या प्रकरणी त्याने खारघर पोलिसांकडे तक्रार केली असता रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पनवेलमध्ये आढळला अनोळखी मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन हद्दीत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५५ वर्षे, उंची पाच फूट सात इंच, अंगाने सडपातळ, रंग सावळा, डोक्याचे केस काळे वाढलेले, दात मजबूत डोळे उघडे, नाक सरळ, चेहरा उभट असून उजव्या बाजूला छातीवर तीळ तसेच अंगात पांढरा त्यावर तांबडया सरळ रेषा असलेला शर्ट, आत सफेद बनियान, राखाडी थ्रीफोर्थ पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी रेल्वे पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक एम.डी. गवळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बीआरएसतर्फे आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल :** भारत राष्ट्र समिती (बीआरएस) पनवेलतर्फे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांच्या आरोग्य सवलतीच्या विचारानूरुप तक्षशीला बुद्धविहार, सुकापूर, पालीदेवद विभागात धम्म चक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून सर्व नागरिकांसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषध वाटप शिबिर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला नरेंद्र गायकवाड, विजय गायकवाड, शैलेश गायकवाड, बीआरएसपार्टीचे पालीदेवद वॉर्ड अध्यक्ष कृनाल कदम, पनवेल विभागातील धडाडीचे कार्यकर्ते शशिकांत सातपुते, सतिश कर्डक, दयानंद वाघमारे, प्रशांत भोसले, निवेदन देठे, सचिन कदम आदी उपस्थित होते.

# 'सीकेटी'त वाचन प्रेरणा दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. १६) एनएसएस विभागातर्फे 'सतत वाचाल तरच वाचाल'या उक्तीचे महत्त्व विशद करणारा 'वाचन प्रेरणा दिन' झाला.

या उपक्रमासाठी सीकेटी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कॉमर्स विभागाच्या सहाय्यक शिक्षिका सुचित्रा मेबेल यांच्यासह ग्रंथालयातील ग्रंथपाल शिल्पा जाधव, सूर्यकांत घोडेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन नियोजन एन एस एस च्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी केले. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून साजऱ्या होणाऱ्या या वाचन प्रेरणा दिनासाठी अकरावी व बारावी कला व वाणिज्य शाखेच्या प्रतिमा मोहिते, सानिया शेख, स्नेहा शिंदे, सुरज पारधी, वेदांत राणे, सीमा पिंगळा, रोहिणी दिगीकर, संस्कृती घोलप या विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी आपापली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपाल सूर्यकांत घोडेकर व शिल्पा जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमावेळी ग्रंथाविषयी व त्यांच्या वाचनाविषयीचे महत्व ग्रंथपाल शिल्पा जाधव यांनी स्पष्ट केले. जीवनातील पुस्तकांचे व त्यांच्या वाचनाचे महत्त्व मुख्याध्यापक कैलास सत्रे व प्राचार्य प्रशांत मोरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विशद केले. सर्व मनोगते व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके भेट दिली. विनीत दिघोळे यांनी आभार मानले.

# लिमये वाचनालयातर्फे विविध स्पर्धा

## वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मुलांसाठी पनवेलमधील के. गो. लिमये सार्व. वाचनालयाच्या वतीने वाचन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. ॲड. माधुरी थळकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी प्रास्ताविकात बोलताना एक गोष्ट सादर केली. संस्थेचे कार्यवाह काशिनाथ जाधव यांनी डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर पनवेल महापालिका शाळा क्र.१ लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयातील मुलांची वाचन स्पर्धा घेतली होती. विशेष म्हणजे त्यामध्ये अमराठी मुलांचा जास्त सहभाग होता.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ वाचक दत्तात्रय जाधव व ग्रंथालयाच्या सहाय्यक लिपिक नंदिनी मंडराई यांनी काम पहिले. मुलांनी उत्तम रितीने पुस्तकांचे वाचन केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक भाग्यलक्ष्मी चिदानंद कोळी, द्वितीय क्रमांक श्रुती सुरेंद्र प्रजापती, तृतीय क्रमांक पल्लवी नवनाथ कांबळे, उत्तेजनार्थशिवम महेंद्र यादव व आलिया रेहमान शेख तसेच विशेष पारितोषिक आर्यन सुरेंद्र प्रजापती या विजेत्या मुलांना संस्थे तर्फे प्रशस्तीपत्रक, पुष्पगुच्छ व पुस्तक भेट वाचकांच्या हस्ते देण्यात आले.

या निमित्ताने ग्रंथपाल निकेता शिंदे, वाचक धाडस भोपी, सुनील खेडेकर, ॲड. माधुरी थळकर व शैलेश बांठिया यांनीही पुस्तक वाचनात सहभाग घेतला होता. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सदस्य रमेश चव्हाण, लिपिक संपदा जोशी सेवक संजय दिवटे व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांना खाऊ देण्यात आला. हिमालिनी कुलकर्णी यांनी आभार मानले.

# पं. उमेश चौधरी यांचा छत्रपती संभाजीनगरमध्ये गायनाचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन दशकाहून अधिक काळ आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभुत्व निर्माण करणारे पनवेलमधील रांजणपाडा भूमिपुत्र पंडित उमेश चौधरी यांचा नवरात्रोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या महोत्सवात शुक्रवारी (दि. २०) शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम होणार आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात गायन क्षेत्रातील अनेक दिग्गज जाणकारांची उपस्थिती असते, त्यामुळे या महोत्सवाचे महत्व अनन्यसाधारण राहिले आहे.



या महोत्सवाचे उदघाटन परम आदरणीय स्वामी विष्णूपादानंदजी महाराज यांच्या हस्ते दिनांक १५ ऑक्टोबर रोजी संपन्न झाले असून या संगीत महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे भारतातील प्रख्यात शास्त्रीय गायीका पंडिता शुभदाताई पराडकर यांच्या गायनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे.

पंडित उमेश चौधरी यांनी शास्त्रीय संगीतातील बारकावे समजून घेत स्वतंत्र मैफली गाजवल्या. भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा वारसा समर्थपणे चालविणारे पंडित उमेश यांनी देशभर स्वतःची ओळख निर्माण केली. त्यांच्या मैफलींनी दीडशेचा टप्पा पार केला असून साऱ्या भारतभर त्यांचे कार्यक्रम झाले असून त्यांना गायन कलेतील साधनेसाठी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या शास्त्रीय गायनाची प्रचिती देशभर पोहचली आहे, त्या अनुषंगाने डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या मानाच्या महोत्सवात सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक म्हणून पंडित उमेश चौधरी यांना आमंत्रित केले आहे. त्यामुळे रायगडच्या या कलाकाराचा स्वर छत्रपती संभाजीनगरीतही गुंजणार आहे.

### मुंबईतील कार्यक्रमाचे आज प्रसारण

***पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाचे नुकताच मुंबईत रेकॉर्डिंग झाले असून या कार्यक्रमाचे प्रसारण बुधवारी (दि. १८) सकाळी १०.३० वाजता मुंबई अस्मिता आकाश वाहिनीवर होणार आहे. विशेष म्हणजे भूमिपुत्रापैकी ते पहिले गायक ठरले आहेत. निश्चितच हे रायगड नवी मुंबईकरांसाठी अभिमानाची बाब आहे.***

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बँकेला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनीनी खारघर सेक्टर ६ येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेला भेट दिली.



या बँक व्हिजिटचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना बँकेमध्ये चालणारे व्यवहार, कर्ज पद्धती, डिमांड ड्राफ्ट, चेक तसेच बँकेतील वेगवेगळ्या कार्यपद्धती या सर्वांचा अनुभव व माहिती देणे हे होते. महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाच्या सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी बँक ऑफ इंडियाला भेट दिली तेथील कार्यरत असणाऱ्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली व बँकेच्या संदर्भात वेगवेगळ्या शंका उपस्थित करून त्या शंकांचे निरसन करून घेतले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे बँक व्हिजिट केल्याबद्दल अभिनंदन केले व वाणिज्य शाखेतील पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या बँक व्हिजिटचे आयोजन वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. फारुक शेख यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. कविता शिंदे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## संपादकीय


# राजकारणाचाच शाप

काही भीषण अपघातांमुळे लोकांच्या मनात समृद्धी महामार्गाविषयी गैरसमज निर्माण झाले असून विरोधकांनी केलेली बेजबाबदार विधाने त्यात भरच घालू शकतात. प्रत्यक्षात या महामार्गावरून प्रवास करण्याचा अनुभव घेतलेले लोक मात्र समृद्धी महामार्गावरील प्रवास सुखकर असल्याचेच सांगतात. महामार्गाच्या बांधणीत कुठलाही दोष नसून महामार्ग गुणवत्तापूर्ण असल्याची ग्वाही तज्ज्ञ जाणकारांनीही यापूर्वीच दिली आहे. आपल्या वाहनाचा प्रकार व वाहनाची प्रत्यक्ष स्थिती ओळखूनच येथील वेगमर्यादेनुसार प्रवास करणे अपेक्षित आहे.

**समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा चुकीच्या कारणासाठी चर्चेत आला असून शनिवारी मध्यरात्री या महामार्गावरील जांबरगाव टोल नाक्याजवळ घडलेल्या भीषण अपघातामुळे पुन्हा एकदा या महामार्गाविषयी उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. महामार्गावर शनिवारी टेम्पो ट्रॅव्हलरने भररस्त्यात उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिल्याने १२ जण जागीच ठार तर २३ जण जखमी झाले. अपघातग्रस्त टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये क्षमतेपेक्षा अधिक एकूण ३५ प्रवासी होते. बुलढाण्यातील बाबा सैलानींच्या दर्शनाला हे सारे गेले होते व तेथून नाशिक जिल्ह्याकडे परतत होते. या अपघाताचे वृत्त येताच पुन्हा एकदा समृद्धी महामार्गाची बांधणीच सदोष असल्याची चर्चा सुरू झाली तर दुसरीकडे काही आरटीओ अधिकाऱ्यांनी महामार्गावर भररस्त्यात ट्रक अडवल्याने पाठीमागून येणारी टेम्पो ट्रॅव्हलर ट्रकवर आदळून हा अपघात झाला असे दर्शवणारा व्हिडिओही व्हायरल झाला. अपघाताच्या काही वेळ आधीचा हा व्हिडिओ असून यात आरटीओ अधिकारी भररस्त्यात ट्रक थांबवून ट्रकचालकाची चौकशी करत होते असे आढळून आल्याचे सांगितले जाते. संबंधित दोन्ही आरटीओ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांना अटकही झाली आहे. चौकशीतून अपघात नेमका कसा झाला त्याचे अधिक तपशील समोर येतीलच, परंतु तुर्तास हाही अपघात मानवी चुकीतून झाल्याचे प्राथमिक माहितीतून दिसते आहे. ही अशी माहिती समोर येऊनही ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी समृद्धी महामार्गावरील अपघातावरून सरकारवर हल्लाबोल करण्याची संधी दवडली नाही. समृद्धी महामार्ग शापित असून लोकांचा शाप त्याला लागला आहे अशी मुक्ताफळेही त्यांनी उधळली. समृद्धी महामार्गावरील अपघातांच्या अनुषंगाने बोलताना त्यांनी सरकारविरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणीही केली. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आलेल्या समृद्धी महामार्गाविषयी ते इतक्या बेजबाबदारपणाने कसे काय बोलू शकतात हा प्रश्नच आहे. गेल्या डिसेंबरमध्ये ११ तारखेला या महामार्गाचे लोकार्पण झाले. महामार्गाचा नागपूर ते शिर्डी हा पहिला टप्पा सुरू करण्यात आला असून शिर्डी ते मुंबई टप्प्याचे काम सुरू आहे. गेल्या दहा महिन्यांमध्ये या महामार्गावर सुमारे बाराशेच्या वर अपघात झाले आहेत व त्यात जवळपास दीडशे लोक मृत्यूमुखी पडले आहेत. येथे झालेले बहुतेक अपघात हे अतिशय वेगाने वाहन चालविणे, लेनची शिस्त न पाळणे, टायरमध्ये पुरेशी हवा नसणे वा टायरची स्थिती सुयोग्य नसणे यामुळे झालेले आहेत. वास्तविक सलग सरळ रेषेतील या महामार्गावरील प्रवासात योग्य वेग राखल्यास वाहनचालकासाठी आव्हानात्मक काहीही नाही, परंतु हा वेगच आपल्या वाहनाच्या स्थितीनुसार तसेच दिवस वा रात्र, तापमान, पाऊस आदींचा अंदाज घेऊन वाहनचालकाने सुयोग्य असा राखणे अपेक्षित आहे. अकारण महामार्गाच्या बांधणीत दोष शोधू पाहणाऱ्यांनी संबंधित मानवी चुका लक्षात घेतल्यास या महामार्गाची नाहक होणारी बदनामी टळू शकेल.**

# चौलचे आंग्रेकालीन एकविरा भगवती मंदिर





चौलच्या प्रसिध्द एकविरा भगवती मंदिराचा जिणोध्दारास दोन तिनशे वर्ष झाली असून सुध्दा या सागवानी लाकडी खांबाने अदयापी मंदिराचा सभागृहाचा डोलारा मजबूतीने सांभाळला आहे. मंदिराचा वरील भाग चौपाकी कौलारू असून देवीचा गाभारा लाकडी व दगडी बांधकामाचा आहे. आंग्रेकालीन लाकडी व दगडी बांधकामाचा उत्कृष्ट नमुना पहाण्याची निश्चित संधी भाविक व पर्यटकांना येथे मिळते.

नजिकच्या उत्खननाने चौल–रेवदंडा नव्हे चौल चंपावतीनगरी इतिहास शके ८०० ते १२०० कालावधीत जोडला गेल्याचे स्पष्ट केले. पौराणिक व्दापारयुगात चौल–रेवदंडाचा उल्लेख रेवतीनगर असा लिखित आहे. इतिहासकालात विदेश व्यापारांशी संलग्न असलेल्या चौल चंपावतीनगरीत प्रसिध्द अशी ३६० मंदिरे व ३६० तलाव असल्याची नोंद सापडते. चौल रामेश्वर, चौल शितळादेवी, हिंगुळजा देवी, मुखरी गणपती, महालक्ष्मी, चंपावतीदेवी, चौल कुडेश्वर मंदिर, रेवदंडा हरेश्वर मंदिर, रेवदंडा मारूती मंदिर आदी मंदिरे अद्यापी इतिहासाची साक्षीदार आहेत, परंतु कान्होजी आंग्रेच्या उत्तर काळखंडात लक्ष्यवेधी ठरलेले चौलचे एकविरा भगवती मंदिर आंग्रेकालीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असून चौलमधील दुसरा क्रमांकाचे प्रसिध्द ऐतिहासिक मंदिर म्हणून ओळखले जाते.

अलिबागपासून १८ किमीवर असलेल्या चौलनाका येथून चौलभोवाळे व आग्राव–शितळादेवी कडे जाण्याचा मार्ग आहे. या दोन्ही मार्गानी भगवती आळीत चौलच्या प्रसिध्द एकविरा भगवती मंदिराकडे जाता येते. चौलभोवाळे येथून पर्वतवासी दत्त मंदिराकडे जाण्याच्या रस्त्याच्या थोडा पुढे आग्राव व बेलाई चौलकडे जाण्याचा मार्ग असून या मार्गातच पाच मिनिटाच्या अंतरावर हे मंदिर आहे, तर चौल शितळादेवीकडे जाण्याच्या मार्गात तेथूनच चौल बेलाई मार्गे महाकाली मंदिरा समोरून गेलेल्या रस्त्यानेसुध्दा या मंदिरात जाता येते, परंतु जाण्यासाठी चौल भोवाळे येथून एकविरा भगवती मंदिराकडे जाणारा मार्ग सोपा आहे. या दोन्ही मार्गाने चारचाकी वाहनांनी जाता येते.

चौलचे एकविरा भगवती मंदिर केव्हा बांधण्यात आले यांचे लिखित सापडत नाही, परंतु आंग्रेकाळात या मंदिराचा जिर्णोध्दार झाल्याचे नोंद येथील मंदिराचे गाभाऱ्याच्या वरील बाजूच्या तुळईवर पाच संस्कृत भाषेत कोरले आहे. त्यानुसार या मंदिराचे जिर्णोध्दाराचे काम शके १६७३, फाल्गुन शु.७ (इ.स१७५२) साली झाल्याचे समजते. या मंदिराचे सभोवताली अर्ध तुटलेली तटबंदी असलेली दिसून येते, त्यामुळे पुर्वी या मंदिराचे सभोवताली सरक्षंणासाठी मजबूत तटबंदी असावी असे दिसते. तसेच आंग्रेच्या उत्तर काळात या मंदिराचा उपयोग अनेकदा किल्लासारखा केल्याचा लिखीत उल्लेख आढळतो.

एकविरा भगवती मंदिर व मूर्ती पुर्वाभिमुख असून मंदिर संपुर्णपणे लाकडी व कौलारू असून समोरील ओसरीचा प्रशस्त हॉल पुर्णपणे दगडी बांधकामाचे असून हा ओसरीचा प्रशस्त हॉल दगडी खांबावर उभारण्यात आला आहे. या दगडी खांबावर उभारलेल्या ओसरीचा प्रशस्त हॉलच्या वरील बाजूकडे व मंदिरात प्रवेश करताना आंग्रेकालीन वास्तू लाकडी कलाकृतीवर नक्षीकामाचे उत्कृष्ट नमुना पहाण्यासारखा आहे.

या मंदिरात वर्षातील तिन वेळा मंदिरात देवीचे घट पुजन होते. पुर्वी येथे नवरात्र उत्सवामध्ये फार मोठी जत्रा भरत असे, परंतु कालाच्या ओघात या यात्रेचे स्वरूप कमी झाले मात्र या मंदिरात नवरात्र उत्सव साजरा करण्यात येतो.

**–महेंद्र खैरे, रेवदंडा**

# चौलची पांडवकालीन हिगुंळजा देवी





चौल भोवाळे पर्वतवासी दत्त मंदिराचे नजिकच हिंगुळजा देवीचे मंदिर आहे. पुरातन व प्राचीन ऐतिहासीक मंदिरापैकी एक असलेले हिंगुळजा माता मंदिरा सभोवतालची कोरीव लेणी पहाण्याजोगे आहे. चौल–भोवाळे पासून फक्त अर्धा किमी अंतरावरील छोटयाश्या डोगंरात स्थानापन्न आहे.

एका सलग पाषाणात कोरलेल्या दगडी मंदिर प्राचीन वास्तुशास्त्राचा उकृष्ट नमुना आहे. डोंगरावर मंदिराचे शेजारी असलेले बारमाही पाण्याचे दोन हौद विशेषः मानले जातात, या हौदात दान केलेले धन काशिला पोहचते अशी आख्यायिका सांगितली जाते. सुमारे १५८ पायऱ्या चढून गेल्यावर डोगरांचे कुशीत वसलेले मंदिर व्दापारयुगातील पांडवकालीन हिंगुलजा मातेचे मंदिर वसलेले आहे. पांडवाचे दुतातील पराभवानंतर अज्ञातवासाच्या काळखंडात व्दापारयुगातील रेवतीनगर म्हणजेच चौल–रेवदंडा नगरीत ३६० मंदिरे व ३६० तलाव बांधण्याचा संकल्प करून प्रति काशी निर्मितीचे काम पांडवांनी हाती घेतले होते. सहा महिने दिवस व रात्र काम करीत असताना पहाटे कोंबड आरवू नये असा दंडक ठेवला होता. पहाटे देवीने कोंबड्यचे रूप घेतले, कोंबडा आरवला, त्यामुळे पांडवांना काम सोडून दयावे लागले. आणि त्या कोंबडयावर पांडवानी बाण सोडून जखमी केले, आणि तो बाण हिंगुळजा मातेच्या मंदिराचे मागील बाजूस चिन्हाने दाखविला जातो, हिंगुलजा माता पांडवांची बहिण आहे, अशी पौराणिक आख्यायिका आजही येथील जुनी मंडळी सांगतात असे हिंगुळजा मातेच्या मंदिरात तिन पिढयाची परंपरा असलेले गुरव संतोष काटकर यांनी माहिती दिली.

भणसाळी लोकांचे आद्यदैवत हिंगुलजा देवी असल्याचे सांगितले जाते. पौष पौणिमेच्या यात्रेचे निमित्ताने भणसाळी लोक मुंबईहून यात्रेसाठी येतात, येथे राहण्यासाठी त्यांनी निवासस्थान उभारलेले आहे. या मंदिराचा भणसाळी समुहाचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून मंदिराचे सुशोभिकरण तसेच देखभाल केली जाते. सद्या मंदिराचे जीर्णोध्दार होऊन सुंदर असे मंदिर भणसाळी समुहाने ट्रस्टच्या माध्यमातून उभारलेले आहे.

मंदिरापलिकडे जवळच ओळीने पाच लहान बौध्द लेणी असून एका लेण्यात अष्टभुजा देवीची मुर्ती आहे. सात क्रमांकाच्या लेण्याबाहेर स्तुपाचे उठाव शिल्प कोरलेले आहे. त्याच्या घडणीवरून स्तुप सन १५० मधील असावा, या या लेण्याच्या पलिकडे दरवाजातून पाऊन वाटेने पुढील टेकडीवरील दत्त मंदिराकडे जाण्याचा मार्ग आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअ‍ॅप लॉन्च करणार प्रोटेक्ट आयपी अ‍ॅड्रेस फिचर





व्हॉट्सअ‍ॅप लवकरच एक नवीन सेफ्टी फिचर लॉन्च करणार आहे. कंपनी लवकरच 'प्रोटेक्ट आयपी अ‍ॅड्रेस' इन कॉल्स हे फिचर लॉन्च करणार आहे. यामुळे वापरकर्त्यांना आणखी सुरक्षितपणे या प्लॅटफॉर्मचा वापर करता येणार आहे. व्हॉट्सअ‍ॅप हे एक सोशल मिडिया प्लॅटफॉर्म आहे. ज्यावरून आपण एकमेकांशी व्हिडीओ कॉल, व्हॉइस कॉल आणि चॅटिंग या माध्यमातून संवाद साधू शकतो. तसेच व्हॉट्सअ‍ॅपची मूळ कंपनी मेटा आहे. व्हॉट्सअ‍ॅप आपल्या वापरकर्त्यांसाठी सतत नवनवीन अपडेट्स आणि फीचर्स लॉन्च करत असते. जेणेकरून वापरकर्त्यांना हे अ‍ॅप वापरताना अधिक सुरक्षित आणि चांगला अनुभव मिळावा.

व्हॉट्सअ‍ॅपच्या नवीन फीचर्स आणि अपडेट्सवर लक्ष ठेवणाऱ्या थ–इशींरखपषे या वेबसाइटच्या रिपोर्टनुसार, सध्या हे नवीन फिचर अँड्रॉइड आणि ळजड च्या नवीन व्हॉट्सअ‍ॅप बीटा वर उपलब्ध आहे. लवकरच सगळीकडे उपलब्ध होणार हे नवीन फिचर अ‍ॅडव्हान्स नावाच्या नवीन सेक्शनमध्ये उपलब्ध आहे. जे प्रायव्हसी सेटिंग अंतर्गत वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. एन्ड टू एन्ड एन्क्रिप्शनच्या माध्यमातून तुमचे सर्व कॉल्स हे सुरक्षित राहतील असे कंपनीचे म्हणणे आहे. म्हणजेच तुम्ही फोनवर बोल्ट असताना कोणीही ते ऐकू शकणार नाही.

सध्या हे फिचर स्थिर बीटा व्हर्जनवर दिसत असले तरी भविष्यात कंपनी ते सर्व वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करून देणार आहे. तथापि, कंपनीने आतापर्यंत ते कधी उपलब्ध करून देण्यात येईल याच्या तारखेबद्दल काही सांगितलेले नाही. मागील काही महिन्यांमध्ये व्हॉट्सअ‍ॅपचे विकसक चॅट लॉक करण्यासाठी 'सिक्रेट कोड' फीचरवर काम करत आहे. यामुळे वापरकर्त्यांना चॅटमध्ये व्हिडीओ मेसेज डिलीट करण्याची सुविधा मिळणार आहे. तसेच कंपनीने टेलिग्राम सारखे चॅनेल फिचर लॉन्च केले आहे. जे तुमच्या आवडत्या लोकांना, नेत्यांना आणि प्रसिद्ध व्यक्तींना फॉलो करण्याची सुविधा देते.

# कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण



**निमित्त**

विश्वनाथ सत्यनारायण सुप्रसिद्ध तेलुगू साहित्यिक. ते ओजस्वी आणि शास्त्रीय दृष्टीने संपन्न असे कवी, कादंबरीकार, नाटककार, समीक्षक आणि निबंध लेखक आहेत. त्यांनी तेलगु साहित्यात आपले असे एक विशिष्ट स्थान निर्माण केलेले आहे. त्यांचा जन्म नन्दनूर, जिल्हा कृष्णा, आंध्रप्रदेश इथे झाला होता. आईवडिलांकडून त्यांना वारसाहक्काने केवळ ईश्वरभक्ती मिळाली. विश्वनाथ सत्यनारायण यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्तचा हा लेख...

लहानपणी त्यांना नन्दनूरपासून ४० मैल दूरवर असलेल्या मछलीपट्टनम या गावी एका इंग्रजी शाळेत घातले होते. त्या शाळेत प्रसिद्ध तेलुगू कवी चेल्लपिल्ल वेंकटशास्त्री हे तेलुगूविषयाचे शिक्षक होते. त्यांच्या प्रेरणेनेच विश्वनाथ सत्यनारायण यांनी साहित्यक्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला होता. हायस्कूलमध्ये शिकत असतानाच विश्वनाथ सत्यनारायण यांनी तेलुगू, इंग्रजी आणि संस्कृत या भाषांवर प्रभुत्व संपादन करून तेलुगू आणि संस्कृतमध्ये काव्य लेखनही केले होते. १९१९ मध्ये त्यांनी पदवी संपादन केली. मछलीपट्टनम् नॅशनल कॉलेजमध्ये तेलुगू भाषेचे अध्यापन (१९२०–२६), मग गुंटूर डिग्री कॉलेजमध्ये अध्यापन केले. पुढे त्यांनी प्राध्यापकी केली. पण स्वतंत्र वृत्तीमुळे ते स्वतःला नोकरीच्या बंधनात बांधून घेऊ शकले नाहीत. त्यांची नोकरी काही काळातच सुटली आणि त्याच काळात त्यांच्या पत्नीचाही स्वर्गवास झाला होता.

विश्वनाथ सत्यनारायण यांच्या १०० पेक्षा जास्त साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यात ६० कादंबऱ्या, २० काव्यसंग्रह, ४ गीतिकाव्य, १३ नाटके, ७ समीक्षाग्रंथ यांचा समावेश आहे. त्यांच्या सुरुवातीच्या कवितांमध्ये सौंदर्य, प्रेम आणि भक्तीचा संगम झालेला दिसतो. तारुण्यात पदार्पण करताच गिरीशकुमार यांची प्रेमगीते त्यांच्या लेखणीतून उतरली होती. आणि पुढे जाऊन शृंगारवीथि हा त्यांच्या काव्यसंग्रह देखील प्रकाशित झाला होता. पण विश्वनाथ सत्यनारायण यांचे प्रेम वासनेने कलुषित नव्हते. तर धार्मिक भावनेने ओतप्रोत भरलेले होते. प्रेम आणि भक्ती या दोन्ही भावनांनी त्यांची कविता ओतप्रोत होती.

नोकरी सुटल्यानंतरच्या काळात रामायण कल्पवृक्षमु या महाकाव्याचे बीज त्यांच्या मनांत रुजले होते. त्यांचे वडील त्यांना म्हणाले होते की, जगात सगळ्यात सुंदर आणि रोचक कहाणी भगवान रामाचीच आहे. बाकी कथा ह्या अन्नवस्त्राच्या कथा आहेत. जीवनातील रिक्त क्षणी रामकथेला काव्यरूप देण्याचा विचार विश्वनाथ यांच्या मनांत आला. जन्मजन्मांतरीचे संस्कार आणि जन्मजात वेदना बरोबर घेवून रामायण कल्पवृक्षमुची रचना करायला त्यांनी सुरुवात केली. ती रचना करायला त्यांना ३० वर्ष लागली. १९७० मध्ये भारतीय ज्ञानपीठद्वारा पुरस्कृत त्यांची ही रचना वाल्मिकी रामायणाप्रमाणे एक गंभीर, प्रौढ अशी रचना आहे. केवळ आशयाच्या दृष्टीनेच नव्हे, तर महानतेच्या दृष्टीनेही त्यांची रचना मूळ काव्याजवळ पोहोचते. कल्पवृक्षमुचे कथानक ६ खंडात विभागलेले आहे. उत्तरखंड त्यात नाही. रामायणात जी नावे आहेत ती नावे त्याना इतर कांडांना (विभागांना) दिली आहेत. त्यांनी प्रत्येक विभागाचे ५ भागात विभाजन केले आहे.

त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. वेयिपंगुल (कादंबरी) साठी त्यांना आंध्र विश्वविद्यालय पुरस्कार (१९३८, हिंदी अनुवाद सहस्त्रफणा या शीर्षकाने भारताचे माजी पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी केला), महाकाव्य श्री रामायण कल्पवृक्षमु या महाकाव्यासाठी त्याना भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार (१९७१), मध्यक्करलु या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्कार, तेलुगू साहित्य समाजाचा कवीसम्राट सन्मान, साहित्य अकादमी फेलोशीप, पद्मभूषण (१९७१) इत्यादी पुरस्कारांचा त्यात समावेश होतो. विधानसभेचे सदस्यत्वही त्यांनी भूषवले आहे.

**(साभार : मराठी विश्वकोष)**


**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : नवरात्रोत्सव सुरू असताना देवीच्या दर्शनासाठी हार, फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे झेंडूच्या फुलांची मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत विक्री होत आहे.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

### तुमचे वय कितीही असूदेत, हे व्यायाम केलेच पाहिजेत!



सध्याच्या धावपळीच्या जगात फिट राहणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे प्रत्येक जण फिट राहण्यासाठी नेहमी काही ना काही उपाय करताना दिसतं. मग वय कोणताही असो वृद्ध लोक असो तरुण मुलं असो फिट राहण्यासाठी ते नेहमी काही ना काही प्रयत्न करत असतात. मग आहार असो किंवा व्यायाम किंवा जिमला जाणं असो असे अनेक वेगवेगळे उपाय लोक करत असतात. त्यात फिट राहण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात व्यायाम करताना दिसतात.

Hindu Squats हा व्यायाम आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतो. तुम्ही तुमची हाडे मजबूत ठेवण्यासाठी तसेच तुमचे स्नायू निरोगी राहण्यासाठी Hindu Squat करू शकता. हा व्यायाम केल्यामुळे तुमचे शरीर लवचिक होते तसेच तुमच्या शरीरातील ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते.

प्रत्येकाने दररोज श्वासोच्छवासाचा व्यायाम करणे गरजेचे आहे. हा व्यायाम केल्यामुळे आपल्या फुफ्फुसांसाठी फायदेशीर ठरते. तसेच हा व्यायाम केल्यामुळे तुमचे फुफुसाचे कार्य सुधारते आणि ते मजबूत राहण्यास मदत होते.

प्रत्येकाने दररोज सकाळी जॉगिंग करणे गरजेचे आहे. ज्यांना लठ्ठपणाची समस्या आहे तसेच ज्यांना फिट राहायचंय अशांनी जॉगिंग करणं गरजेचं आहे. जॉगिंग केल्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. तसेच तुमची रोगप्रतिकार शक्तीदेखील मजबूत होते.

स्ट्रेचिंग केल्यामुळे तुमचे शरीर लवचिक राहण्यास मदत होते. तसेच तुमचे हाडे मजबूत होतात, स्नायू वरील ताण कमी होण्यास मदत होते. तसेच स्ट्रेचिंगमुळे शरीरातील वेदना देखील कमी होण्यास मदत होते. स्ट्रेचिंगमुळे आपल्या शरीरातील स्टॅमिना वाढण्यास मदत होते त्यामुळे स्ट्रेचिंग करणे शरीरासाठी खूप फायदेशीर ठरते.

प्रत्येकाने दररोज वेगाने चालण्याचा व्यायाम केला पाहिजे. हा व्यायाम केल्यामुळे तुमचे हृदय निरोगी राहण्यास मदत होते. नियमितपणे चालल्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते. तसेच ज्यांना डायबिटीसचा त्रास आहे अशांनी देखील वेगाने चालण्याचा व्यायाम केला पाहिजे.

# शाळेत सुविधा असल्यावर चांगले विद्यार्थी घडतात -ना. आदिती तटकरे




**माणगाव : प्रतिनिधी**

शाळेत सुविधा चांगल्या प्रकारच्या असल्या तर आपण चांगले विद्यार्थी घडवू शकतो, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी इंदापूर येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

मूलभूत सुविधा २५१५अंतर्गत झालेल्या तळारोड ते नवजीवन विद्यामंदिर तळाशेत (इंदापूर) येथील रस्ता डांबरीकरण कामाचे उद्‌घाटन मंगळवारी (दि. १७) महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शेखर देशमुख, उपाध्यक्ष चंद्रकांत राऊत, प्रदेश राष्ट्रवादी युवक सचिव दिपक जाधव, इंदापूर विभाग राष्ट्रवादीचे अध्यक्ष काका नवगणे, सुरेश वाघ, पं. स. माजी उपसभापती अविनाश मांडवकर, माजी उपसरपंच उदय अधिकारी, इंदापूरचे सरपंच समीर मेहता, सदस्य नितीन घोणे, मेघनाथ सातपुते आदींसह कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

ना. आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ ही तालुक्यातील एक मोठी शिक्षण संस्था असून या संस्थेत ७००हून अधिक विद्यार्थी ग्रामीण भागातून शिक्षण घेत आहेत. शाळेकडे येणारा हा रस्ता झाला पाहिजे हि माझी इच्छा होती. दोन महिन्यांत रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळवून आज या रस्त्याच्या कामाचे उदघाटन करताना मला अतिशय आनंद होत आहे. शाळेतील प्रयोगशाळेला साहित्य देण्याचा आपण प्रयत्न करू, तसेच इतरही आपल्या मागण्या पूर्ण करून जास्तीत जास्त सहकार्य करण्याचा प्रयत्न करेन, असे आश्वासनही दिले.

मंडळाचे अध्यक्ष शेखर देशमुख म्हणाले की, ना. आदिती तटकरे यांनी या रस्त्याचे काम करून दिलेला शब्द पूर्ण केला. या शाळेच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी खासदार तटकरे साहेबांनी आतापर्यंत ७५ लाखांचा निधी दिला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक शब्बीर हज्जू यांनी तर प्राचार्य अशोक गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची वेबसाईट हँग

**मुरूड : प्रतिनिधी**



ग्रामपंचायत निवडणूक जाहीर झाल्यानंतर मंगळवारी (दि. १७) दुसऱ्या दिवशी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची काही काळाकरीता हँग झाली होती. यामुळे गोंधळ उडाला.

तालुक्यातील एकदरा, आगरदांडा, राजपुरी, शीघ्रे, विहूर, नांदगाव, काशीद, भोईघर, मांडला, साळाव, बोर्ली, मोठेखार, चोरढे, वळके व तळेखार या १५ ग्रामपंचायतींची निवडणूक होणार आहेत. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी १६ ते २० ऑक्टोबर असा कालावधी आहे. अर्ज दाखल करण्याची वेळ ११ ते ३ ठेवण्यात आली आहे. निवडणुकीचे अर्ज ऑनलाईन भरले जातात, परंतु मंगळवारी ही वेबसाईट हँग झाली.

याबाबत तहसीलदार रोहन शिंदे यांनी सांगितले की, आता साईट सुरू झाली आहे. अर्ज दाखल करण्यासाठी तीन दिवस शिल्लक आहेत. या दरम्यान सर्वांचे अर्ज दाखल होतील.

## भाजपच्या रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ सहसंयोजक सदस्यपदी नितीन परमार

**कर्जत** : नगर परिषदेचे माजी नगरसेवक नितीन परमार यांची भाजप रेल्वे प्रवासी प्रकोष्ठ सहसंयोजक सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



परमार हे भाजपचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. नितीन परमार हे अनेक वर्षांपासून रेल्वेप्रवाशांच्या समस्यांबाबत पाठपुरावा करीत आहेत. त्यांची पक्षाशी एकनिष्ठा पाहून भारतीय जनता पार्टी अध्यक्ष व महाराष्ट्र विधान परिषद महाराष्ट्र सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटनात्मक सहसंयोजक, रेल्वे प्रवासी प्रकोष्ठपदी परमार यांची नियुक्ती केली आहे.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा...

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने श्री. जनार्दन गौरू लभडे (''मालक'') यांच्या मालकीच्या मौजे खानावळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील परिशिष्ठात नमूद असलेली जमीन मिळकत (''जमिन'') चे मालकी हक्क आणि अधिकार आमचे अशिलांनी सदर जमिन प्रस्तावित खरेदीसाठी तपासत आहोत.

सर्व व्यक्ती/ संस्था, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, ट्रस्ट, धर्मादाय संस्था, भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी संस्था, वैयक्तिक व्यक्ति अथवा व्यक्तींची संस्था, संघटना, कर्जदार, प्राधिकरण, नोंदणीकृत अथवा अंनोंदणीकृत यांचा सदर जमिनीबाबत किंवा त्यातील भागाबाबत कसलाही हक्क, अधिकार, हितसबंध, दावा, हरकत अथवा आक्षेप, कर्ज, बोजा अथवा गहाण, दान, भाडेकरार, लिज, सामंजस्य करार, साठेकरार, अदलाबादल करार, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र, खरेदी, लेखी अथवा तोंडी वचनबद्धता पोटगी, मेहेर, मागणी, वहिवाट, ताबा, तडजोड, आदेश, हुकूम, लवाद निर्णय इत्यादि असल्यास खालील नमूद दिनांकच्या १४ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. अशाप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणीही काहीही न कळविल्यास असा कोणताही हक्क, अधिकार, हितसंबध, दावा, हरकत अथवा आक्षेप सोडून देण्यात आलेला आहे आणि/ किंवा त्याचा त्याग करण्यात आलेला आहे आणि आमचे आशिलांवर बंधनकारक नाही असे समजण्यात येईल. तसेच, सदर जमिन हि सर्व प्रकारच्या बंधांनातून, हक्कापासून आणि अधिकारापासून मुक्त असून सदर जमिन निर्वेध व बोजेवीरहित आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ठ**

(सदर जमिनीचे वर्णन)

मौजे खानावळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील नमूद सर्वे / हिस्सा क्रमांकाची जमिन तदंगभूत वस्तूंसह खालील नमूद प्रमाणे:

| अनु क्र. | सर्वे / हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर. प्र.मध्ये) | क्षेत्र (चौरस मीटर्स मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | २८/१ | ०.५० .७९ | ५०७९ |

दिनांक १८ ऑक्टोबर २०२३

सही/-
**श्री. पवन आर पाटील, वकील**
शॉप नं. ५, एस एम चंद्रभागा, प्लॉट नं. १००,
सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई - ४१०२०६
adv.patilpavan@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. सिताराम सुदाम चव्हाण, रा. लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**

**मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड.**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १९४ | २० | ०-२५-०० | ०.५३ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक: १७/१०/२०२३**

**खरेदीदाराचे वकील**
**सही/-**
**ॲड. एस. के. राणे**

पत्ता:- शॉप नं १२३, मुन्सीपल शॉपींग कॉम्पलेक्स, पहीला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६, मो. ९८१९८६९२१२.

## महाराष्ट्र शासन

### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in  Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ७७ सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५- २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ९५४०८० | महाड येथील वर्ग २,३,४ कर्मचारी निवास्थानाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ७,२०,१९,३४६/- | ३६१,०००/- | ३३६०/- | १२ महिने | N. A |
| ९५४०८१ | माणगाव जि रायगड येथे जिल्हा न्यायाधीश दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर) व दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचेकरीता तीन निवासस्थाने बांधणे. | २,१६,५५,०७५/- | १,५०,०००/- | २३६०/- | १२ महिने | N. A |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | **निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईनच निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ** | दिनांक. १८/१०/२०२३ (सकाळी १०.०० पासून) ते दि. १/११/२०२३ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | **निविदा पुर्व बैठक** | मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५/१०/२०२३ वेळ १२.०० वाजता. |
| ३ | **ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण** (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता,रायगड (सा.बां.) मंडळ विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि. ०३/११/२०२३ वेळ १२.०० पासून |

टिप:- परिपुर्ण निविदा या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४७२५**
**दिनांक : १७/१०/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड.**

# मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**अलिबाग** : भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारीत वेळापत्रक जाहीर केले आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

पुररिक्षणपूर्व उपक्रमांतर्गत मतदान केंद्राचे सुसूत्रीकरणे व प्रमाणीकरण, कंट्रोल टेबल अद्यावत करणे २२ ऑगस्ट ते ९ ऑक्टोबर, नमुना १-८ तयार करणे आणि १ जानेवारी-२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत पुरवणी व एकत्रित प्रारुप यादी तयार करणेसाठी १० ते २६ ऑक्टोबर या कालावधीत होईल. पुनरिक्षण उपक्रमांतर्गत एकत्रित प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करणे २७ ऑक्टोबर, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबरदरम्यान आहे.

या कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी जवळच्या मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांनी कळविले आहे.

### CHANGE OF NAME

As Affidavit No. 14058/23 date 16/10/2023 I Kushinder Janu Mhatre, declares that my name as per Aadhar card is Kushinder Janu Mhatre , my son's name as per Aadhar card reads as Meghraj Kushinder Mhatre and my wife's name as per Aadhar card reads as Yashodha Kushinder Mhatre which is true and final.

Sign. by New Name
**Kushinder Janu Mhatre**

## उरण नगरपरिषद

### कोटेशन नोटीस

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी एजन्सी, तांत्रिक सेवा पुरवठादार / कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा/ दरपत्रके मागवित आहे. निविदा/दरपत्रक दिनांक ३०/१०/२०२३ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|
| १ | उरण शहराच्या दुसऱ्या सुधारीत विकास योजनेमधील आरक्षित जागेवरती सदर आरक्षणासंदर्भात फलक बसविणे. | ५०००/- | रु. १,०००/- |

सदर कामाच्या अटी/ शती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**जा.क्र.उनप/बांवि/१८३४/२०२३-२०२४**
**उरण नगरपरिषद,**
**उरण, दिनांक : १७/१०/२०२३**

**सही/-**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

## नमुना १ -

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालय**
**ता. महाड, जि. रायगड**
**दिनांक. १६/१०/२०२३**

**क्रमांक :- भूसंपादन/कात-५/काळीज-खरवली/थेख/नोटीस/२०२३**

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांनी नवीन पुलाचे बांधकामासाठी रस्त्यासाठी काळीज ते खरवली गावचा रस्ता, या सार्वजनिक प्रयोजना करीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३४/ अ-२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणेसंबंधी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे आदेश क्रमांक भूसंपादन/ टे- ६/३२७४२/मौजे काळीज व खरवली/२०२२ दिनांक ०७/०७/२०२२ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, **मी डॉ. ज्ञानोबा बानापुरे, उपविभागीय अधिकारी महाड** याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.
२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्युल -१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.
३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे जिल्हा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.
४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांचेकडे दाखल करावीत.
५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.
६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग महाड, यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची १**

**मौजे काळीज, ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | एकूण क्षेत्र (हे. आर) | संपादित क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | १०८/१ पै. | २.३५.९४ | ०.०६.४० |
| | एकूण | | **०.०६.४०** |

**मौजे खरवली, ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | एकूण क्षेत्र (हे. आर) | संपादित क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | ५९/०पै. | १.५४.० | ०.०२.३० |
| २ | ३८/९पै. | ०.०७.० | ०.०१.२० |
| ३ | ४५/३पै. | ०.५२.९ | ०.००.३० |
| | एकूण | | **०.०३.८०** |

एकदंरीत एकूण १०.१०.२० हे. आर

**ठिकाण : महाड**
**दिनांक :१६/१०/२०२३**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/१२४/२०२३-२०२४**

**सही/-**
**(डॉ. ज्ञानोबा बानापूरे)**
**उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभाग महाड**

# सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर चर्चा

## आमदार मंदा म्हात्रेंनी मांडली स्वच्छतामित्रांची बाजू; आयुक्तांसोबत बैठक

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई हे आपले शहर स्वच्छतेमध्ये देशात नेहमीच आघाडीवर राहिले आहेत. तसेच शहरात मोठ्या संख्येने वेगवेगळ्या ठिकाणी साफसफाई कर्मचारी हे आपले काम चोख पद्धतीने होत असतात, परंतु स्वच्छता कर्मचारी यांचे प्रश्न व समस्या जाणून घेण्यास कोणीही पुढाकार घेत नाही. आमदार मंदा म्हात्रे यांनी सोमवार (दि. १६) आयुक्त राजेश नार्वेकर यांची भेट घेत स्वच्छतामित्रांची बाजू मांडली. त्यांचे रखडलेले प्रश्न मांडले. आयुक्तांनी ते प्रश्न सोडविण्याचे आश्वासन आमदार मंदा म्हात्रे यांना दिले.



बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी ६ ऑक्टोबर २०२३ रोजी समाज समता कामगार संघ यांची भेट घेतली होती व त्यांना आश्वासित केले होते की नवी मुंबई महापालिका आयुक्त हजर होताच प्रथम बैठक ही समाज समता कामगार संघ यांच्यासमवेत असेल आणि सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या कार्यालयात बैठक संपन्न झाली.

नवी मुंबई महापालिका पालिका मुख्यालयाजवळ गेली १३ दिवस विशिष्ट मागण्याकरिता (साफसफाई कर्मचारी) आमरण उपोषणाला बसले आहेत. आमदार मंदा म्हात्रे यांनी त्यांच्या मागण्या व त्यांचे प्रश्न आयुक्त साहेबांसमोर मांडल्या. तसेच पाच साफसफाई कर्मचारी जे मयत झाले आहेत त्यांच्या वारसांनादेखील त्यांच्या जागेवर घेण्यात येईल, असेही आयुक्त नार्वेकर यांनी आमदार मंदा म्हात्रेंना दिले. आमदार मंदा म्हात्रे यांनी उपस्थित केलेल्या मागण्या व प्रश्नांवर नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सकारात्मकता दाखवत सदरचे प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

**नवी मुंबई महापालिकेला विसर पडला आहे की त्याच साफसफाई कर्मचाऱ्यांमुळे पालिकेला स्वच्छतेमध्ये पारितोषिके मिळत आहे व याच साफसफाई कर्मचाऱ्यांमुळेच नवी मुंबई महापालिका ही स्वच्छतेमध्ये देशात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. त्यामुळे साफसफाई कर्मचारी त्यांच्या न्यायाच्या हक्कासाठी गेली १३ दिवस उपोषणाला बसले असून त्यांना न्याय देण्याचे कर्तव्य लोकप्रतिनिधी व नवी मुंबई महापालिकेचे आहे.**
**-मंदा म्हात्रे, आमदार, बेलापूर**

## निवडक



### गंभीर गुन्हे दाखल आरोपीला अटक

**पनवेल :** उत्तर प्रदेश येथील गँगस्टर ॲक्टचे तीन गुन्हे, दुहेरी खुनासह दरोडा एक, दरोड्याचे तीन गुन्हे, हत्येचा प्रयत्न, सात जबरी चोरी व इतर असे एकूण ३३ गंभीर गुन्हे दाखल असलेला उत्तर प्रदेश सरकारचे ५० हजारांचे बक्षीस जाहीर असलेल्या फरार आरोपीला पनवेल शहर पोलीस व उत्तर प्रदेश स्पेशल टास्क फोर्स, वाराणसी युनिट यांचे संयुक्त कारवाईत अटक केली आहे. हारिस उर्फ छोटू अब्दुल अजीज (रा. मुडीयार) असे या आरोपीचे नाव आहे. आरोपीला अटक केल्यानंतर तपास केला असता, तो मागील सुमारे दोन महिन्यांपासून नवी मुंबईमध्ये ओला, उबेर या कंपनीमध्ये स्वतःकडे कोणताही अधिकृत वाहनचालकाचा परवाना नसतानादेखील त्याचे भावाचे वाहन चालकाचा परवाना व नाव वापरून चालक म्हणून नोकरी करीत असल्याचे दिसून आले.

### स्वप्नील देसाईंचा शोधनिबंध प्रसिद्ध

**नवी मुंबई :** महापालिकेचे अभियंता स्वप्नील देसाई यांचा नवी मुंबई महापालिकेच्या मलनिःस्सारण व्यवस्थापनावरील



शोधनिबंध इंटरनॅशनल रिसर्च जर्नल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (IRJET) यासारख्या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. मेकॅनिकल इंजिनिअर असलेल्या स्वप्निल देसाई यांनी एनर्जी टेक्नॉलॉजीमध्ये एम.टेक. केलेले असून सद्यस्थितीत ते पर्यावरण अभियांत्रिकी (सांडपाणी) या विषयात पीएचडी करीत आहेत. स्वप्निल देसाई यांचा, 'नवी मुंबई, महाराष्ट्र येथे अमृत मिशन अंतर्गत औद्योगिक उपयोगी दर्जाचे पाणी निर्मिती करण्यासाठी अल्ट्रा फिल्टरेशन टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टचे डिझाईन आणि व्यवहार्यता यांचे विश्लेषण' या विषयावरील शोधनिबंध प्रसिद्ध झाला आहे.

### महिला आघाडी संपर्कपदी गव्हाणे

**नवी मुंबई :** शिवसेना महिला आघाडीच्या शिर्डी लोकसभा संपर्क प्रमुखपदी नवी मुंबईत शिवसेनेच्या सुरेखा गव्हाणे



यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथे शिर्डी लोकसभा संपर्क प्रमुखपदी निवड केल्याचे पत्र गव्हाणे यांना देण्यात आले. संगमनेर व अकोले या दोन विधानसभा मतदारसंघात त्यांनी काम केले आहे. नवी मुंबईत शिवसेनेच्या महिला आघाडीच्या माध्यमातून केलेल्या कामाची दखल म्हणून सुरेखा गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे. गव्हाणे यांचा शिर्डी लोकसभा मतदारसंघात देखील मोठा जनसंपर्क आहे.

# कोकण रेल्वेचा स्थापना दिन साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

कोकणच्या विकासात मैलाचा दगड ठरलेल्या कोकण रेल्वेने आपला ३३वा स्थापना दिवस सिडको एग्झिभीषन सेंटर येथे सोमवारी (दि. १६) मोठ्या उत्सहात साजरा केला. स्थापना दिन समारंभात कोकण रेल्वेचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय गुप्ता यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली.

कोकण रेल्वेने आपल्या मार्गाचे १०० विद्युतीकरण पूर्ण केले आहे. शिवाय आतापर्यंतचा सर्वाधिक प्रवासी महसूल ९६३.४३ कोटी, सर्वाधिक मालवाहतूक महसूल ७६७.४७ कोटी, सर्वाधिक प्रकल्प महसूल ३२७४.७० कोटींसह सर्वाधिक एकूण महसूल ५१५२.२३ कोटी रुपये कमावला असून, उपक्रमास आतापर्यंतचा सर्वोच्च निव्वळ नफा - २७८.९३ कोटी रुपये झाला आहे. याशिवाय यावर्षी कोकण रेल्वेने मूळ लोडिंगमध्ये ३० टक्के वाढ केली आहे, जी मूळ लोडिंगमध्ये आतापर्यंतची सर्वाधिक आहे. यानिमित्ताने कोकण रेल्वे व्यवस्थापनाच्या २५ वर्षांच्या अखंडित सेवापूर्तीनिमित्त महामंडळातील अधिकारी-कर्मचारी यांचा विशेष सत्कार कोकण रेल्वेचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आला.

### अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान

या वेळी कोकण रेल्वेचे उप महाव्यवस्थापक (जनसंपर्क) गिरीश करदीकर, कार्यकारी संचालक (प्रकल्प) एल. प्रकाश, डेप्युटी लेखा अधिकारी अरूप बागूल यांच्यासह विविध विभागांत उल्लेखनीय काम केलेल्या विभागांना, तसेच वैयक्तिक कामगिरी केलेल्या अधिकारी-कर्मचारी यांचा स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात कोकण रेल्वे जनसंपर्क विभागालादेखील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी कोकण रेल्वेचे संचालक राजेश भडंग (फायनान्स), संतोष कुमार झा (ऑपरेशन्स, कमर्शिअल), आर. के. हेगडे (वे-वर्कस) व्यासपीठावर उपस्थित होते.

# शिक्षक आणि पदवीधारकांनी मतदार नावनोंदणी त्वरित करावी

### कोकण विभागीय आयुक्तांचे आवाहन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार होऊ ईच्छिणाऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात पदवीधारकांनी नोंदणी त्वरीत करावी, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले. मंगळवारी (दि. १७) कोकण भवनातील समिती सभागृहात ते बोलत होते.

भारत निवडणूक आयोगाकडून ३० सप्टेंबर ते ३० डिसेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. याघोषित कार्यक्रमानूसार मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदारसंघाची टप्प्याटप्याने नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे.

शिक्षक मतदार संघाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये ज्या व्यक्तिंची नावे समाविष्ट आहेत. अशा सर्व व्यक्तींना सुध्दा नवीन यादी तयार करतांना विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. शिक्षक मतदार संघाच्या अर्हतेसाठी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदारसंघाची सर्वसाधारणपणे रहिवासी आहे तसेच जिने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षांमध्ये राज्यातील एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले आहे, अशी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले जाण्यास पात्र राहील. तसेच शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव दाखल करण्यासाठी सादर केलेल्या नमुना १९ मधील अर्जासोबत संबंधित व्यक्तीने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षांमध्ये एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले असल्याबाबत शैक्षणिक संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

मुंबई विद्यापीठ, खासगी विद्यापीठ यांच्यासह विविध शैक्षणिक संस्था, खासगी आस्थापना यासह विविध पातळीवरुन पदवीधारकांनी नाव नोंदवावे असे आवाहन यावेळी विभागीय आयुकत यांनी केले.

# गव्हाण विद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन ऑफ इंडिया भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले.



या वेळी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद करून या विषयाची गोडी लागावी म्हणून अनेक उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या वतीने पुस्तके वितरित करून त्यांना 'एक तास वाचनाचा' उपक्रम घेतला. सहावी या वर्गाच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला संस्कृती विभागाच्या प्रमुख हर्षदा पाटील यांच्या नियोजनात उपक्रम सादर झाला. या वेळी विद्यालयाचे उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, शितलकुमार म्हात्रे, प्रमोद परदेशी, यु.ए.म्हात्रे, सुजाता शेलार आदी उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्या अत्यंत नेटक्या नियोजनाने ग्रंथ प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना विद्यालयाचे उपप्राचार्य प्रमोद मंडले उपस्थित होते. ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी याप्रसंगी केलेल्या भाषणामध्ये ग्रंथांचे महत्त्व आणि वाचनामुळे जीवनात अमुलाग्र बदल होतो हे उदाहरणांसह विद्यार्थ्यांना सांगून विद्यार्थ्यांना वाचनाप्रती आवड निर्माण करण्यासाठी त्यांचे आत्मभान प्रेरित केले. द्रोपदी वर्तक यांनीही याप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या आत्मचरित्राचे आवर्जून वाचन करण्याचा सल्ला दिला.

# ब्रेल पुस्तकांचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक पांढरी काठी दिनाचे औचित्य साधून नेरूळच्या ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात नवी मुंबई महापालिकेच्या सचिव चित्रा बाविस्कर लिखित 'चला फुलांच्या बागेत' व 'हसा मुलांनो हसा' या ब्रेल लिपीतील सातव्या व आठव्या पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राम नेमाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

मंडणगड, जि. रत्नागिरी येथील स्नेहज्योती अंध निवासी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रतिभा सेनगुप्ता यांनी ही पुस्तके ब्रेलमध्ये रुपांतरीत केली आहेत. या वेळी प्रा. डॉ. नेमाडे, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, डॉ. अशोक पाटील यांनी एकूणच आयोजन व पुस्तकांच्या प्रकाशनाबद्दल संबंधितांची प्रशंसा केली.

सूत्रसंचालन 'ज्येष्ठ नागरिक संघा'चे उपाध्यक्ष प्रभाकर गुमास्ते आणि 'युथ कौन्सिल-नेरूळ' चे सचिव सुभाष हांडेदेशमुख यांनी केले. या वेळी रणजित दिक्षित, दीपक दिघे, विकास साठे, प्रकाश लखापते, अजय माढेकर, रजनी कलोते, दिलीप चिंचोळे, सुरेश वाघ हेही सभागृहात उपस्थित होते.



### दुर्गामाता दौड (माळ तिसरी)





**नवीन पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने आयोजित दुर्गामाता दौड या धार्मिक उपक्रमाची तिसरी माळ नवीन पनवेल येथे गुंफण्यात आली. सेक्टर १३ ए टाईपपासून सुरु होऊन बांठिया हायस्कूल त्यानंतर पोदी त्यानंतर पुन्हा ए टाईप येथे देवाची आरती घेऊन या दौडची सांगता झाली. या दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले.**



दुर्गा माता महिला मंडळ, दांडा-केगाव, उरण




जय अंबे नवरात्रोत्सव मंडळ, पाले, उरण



गुरुकुल अकॅडमी सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, उरण



एमईएस सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, नेव्हल स्टेशन करंजा, चुनाभट्टी, उरण



शुभांगी विनायक कोळी, मोरा, उरण



सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, एनएडी चुनाभट्टी कॉलनी, उरण

# उरणमध्ये गावदेवींचा जागर

**उरण : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवात उरण परिसरातील गावोगावी असलेल्या देवींच्या मंदीरात जागर सुरू झाला आहे. तर अनेक ठिकाणी घटस्थापना केली आहे. तालुक्यात पुरातन काळातील करंजा येथील द्रोणागिरी देवी, उरण शहरातील शितळादेवी (गावदेवी), मोरा गावातील एकविरा देवी आणि नवीन शेवा गावची शांतेश्वरी, डोंगरीची आंबादेवी जसखार ची रत्नेश्वरी देवी आदी आदिशक्तीची मंदिरे आहेत.

एकविरा देवी म्हणजे अवघ्या आगरी-कोळ्याचीच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. काल्र्यातील एकवीरा देवीच्या मंदिराप्रमाणेच उरण शहर पासून तीन किमीच्या

### घरोघरी घटस्थापना



उरण-मोरा रस्त्यावरील डोंगरातील एका पाषाणी गुहेत एकविरा देवीचे मंदिर आहे. हे एका मोठ्या काळ्या कोरीव काम केलेले मंदिर आहे. या कोरीव मंदिराती पाषाणातच श्री एकविरा देवी विराजमान झाली आहे.

करंजा येथील आगरी-कोळी समाजाचे श्रद्धास्थान असलेले श्री द्रोणागिरी देवीचे दुसरे प्राचीन मंदिर आहे. द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी निसर्गाच्या कुशीत हे मंदिर आहे. हे मंदिर साधारणपणे ३५० वर्षांपूर्वीचे आहे. अरिष्टात भक्ताला स्वप्नात येऊन दृष्टांत दिल्यानंतर सापडलेल्या देवीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. तीच ही द्रोणागिरी देवी होय.

उरण शहरातील देऊळवाडी येथील उरणावती व शितला देवीचे आणखी एक पुरातन मंदिर आहे. सुमारे २५० वर्षांपूर्वीचे हे मंदिर आहे. उरणावती देवीच्या नावावरुनच शहराचे नावही उरण पडले असल्याचे सांगितले जात आहे. देवीच्या मंदिरासमोरच पाषाणी दिपमाळा आहे. दर वर्षी चैत्र महिन्यातील पौर्णिमेला देवींचा उत्सव असतो. या उत्सवासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात.

## निवडक

### सुधागड येथे स्वच्छता आणि वृक्षारोपण



**पाली** : जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून सोमवारी (दि. १६) पाली-सुधागड येथे स्वच्छता आणि वृक्षारोपण करण्यात आले तसेच कापडी पिशव्यांचे वाटपदेखील करण्यात आले. प्रशिक्षणार्थींना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथ देण्यात आली. संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबविण्यात आले. या वेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षिका श्रद्धा चव्हाण, रोहिणी जाधव आदी उपस्थित होते.

### मोरे महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



**रोहे** : एम. बी. मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव येथे ग्रंथालाय समितीतर्फे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या ९२व्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी प्रथम वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी संस्कृती काणेकर हीने वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व सांगितले. या वेळी प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल निर्मला थोरात यांनी केले.

### संतोष गायकवाडांना आदर्श शिक्षक पुरस्कार



**पाली** : लायन्स क्लब ऑफ नाशिक कॉर्परेट, संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने माध्यमिक विद्यालय वाघोशीचे शिक्षक संतोष गायकवाड यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात सेवा करीत असताना त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण व क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत गायकवाड यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश खैरे, प्रकल्प प्रायोजक सुनील पाटील, अध्यक्ष उदय कोठावदे, प्रकल्प संचालक सागर बोंडे आदी उपस्थित होते. गायकवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रोह्यात आरोग्यसेवा अद्ययावत करण्याची गरज

## उपजिल्हा रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञांची कमतरता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील आरोग्यसेवा अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली आहे. उपजिल्हा रुग्णालय येथील डॉक्टरांची आठ पदे मंजूर आहेत. त्यापैकी फक्त तीन पदे भरलेली असून पाच पदे ही कॉन्ट्रॅक्टद्वारे भरलेली आहेत. या पाचपैकी एका डॉक्टरकडे माणगावचे चार्ज असल्याने रोहा रुग्णालयात सहाय्यक अधीक्षक, तज्ज्ञ डॉक्टरांसह ज्युनियर क्लार्क व वर्ग ४चे कामगार कायमस्वरूपी मिळण्याची गरज आहे.



या जागा भरल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना उपचार मिळण्यास अडचणी येणार नाहीत. अपघात विभागात वरणोपचारक (ड्रेसर) हे वर्ग ४मध्ये येणारे पद रिक्त असल्याने ती जबाबदारी इतरांना पार पाडावी लागते. अपघात झालेला किंवा दुखापत झालेला रुग्ण प्रथमोपचारासाठी आल्यावर त्याची अनेकदा गैरसोय होते.

उपजिल्हा रुग्णालयात गेल्या तीन आठवड्यांपासून लहान मुलांचे औषधांचे डोस उपलब्ध झालेले नाहीत. परिणामी लहानग्यांच्या आरोग्याची हेळसांड होत आहे. त्याचबरोबर दुखापत झालेल्या रुग्णांना टाके टाकायचे वैगरे छोट्या-मोठ्या गोष्टी कधी उपलब्ध असतात तर कधी नसतात.

हॉस्पिटलमधील कारभार हा काही वेळा शिकाऊ डॉक्टरांच्या आधारे चालतो. त्यामुळे रोहेकरांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. आयुष्मान भारतच्या माध्यमातून नियुक्त केलेले डॉक्टर हे रोहेकरांना सेवा देण्यास असमर्थ ठरत असल्याने त्यांच्या जागी कायमस्वरूपी तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती होणे गरजेचे आहे. विंचू दंश, सर्पदंश व श्वानदंश यावर आवश्यक त्या औषधांचा साठा काही वेळा रुग्णालयात उपलब्ध नसल्याने अनेकांना प्राण गमवावे लागलेले आहेत.

### रिक्त पदांचा तपशिल

**वैद्यकीय अधिकारी एक, सामान्य फिजिशियन, एक शल्य चिकित्सक (सर्जन) एक, भूलतज्ज्ञ एक (सध्या ऑनकॉल बोलावले जाते), अधिपरिचारिका दोन, कक्ष सेवक दोन, शस्त्रक्रिया परिचर एक, वरणोपचारक एक, शिपाई एक आदी रिक्त पदे भरण्याची उपजिल्हा रुग्णालयात गरजेचे आहे.**

साथीच्या आजारांसाठी लागणारी प्रतिजैविकांचाही साठा काही वेळा अत्यल्प असल्याने अनेकदा ती औषधे खासगी दुकानातून घ्यावी लागतात. त्यामुळे या सर्व समस्या लवकरात लवकर सोडविण्याची मागणी होत आहे. याबाबत वैद्यकीय अधीक्षक अंकिता मते-खैरकर यांना विचारले असता, त्यांनी अशी माहिती तोंडी सांगता येणार नसल्याचे व त्यासाठी रुग्णालयात अर्ज करावे लागेल, असे सांगितले.


**उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदांसंदर्भात अहवाल आणि मागणीपत्र आरोग्य विभागाकडे दिले आहे. याबाबत पाठपुरावा करीत आहोत. येथील चार्ज अतिरिक्त असला तरी आपण सप्ताहातील तीन दिवस येथे येत असतो. एनआरएचएम आणि कॉंट्रॅक्ट बेसिसवर उपलब्ध मनुष्यबळाद्वारे रुग्णांना योग्य सेवा देण्याचा प्रयत्न आहे.**

**-एन. के. राहिरे, प्रभारी सहाय्यक अधीक्षक, रोहा**

## भिसेखिंडीत वाहने बंद पडण्याच्या संख्येत वाढ

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे-रोहा मार्गावरील भिसेखिंडीतून दररोज हजारो वाहनांची वर्दळ सुरू असते. रोहा एमआयडीसी तसेच साळाव येथील केमिकल कारखान्यात जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाली आहे. त्यातच सानेगाव जेटीवर कोळसा वाहतूक करणाऱ्या ट्रकच्या संख्येतदेखील झपाट्याने वाढ झाल्याचे पहावयास मिळत आहे, मात्र अनेक वेळा ही अवजड वाहने खिंडीत बंद पडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यात भिसेखिंडीत सकाळच्या वेळी धुके असल्याने वाहतूक धीम्या गतीने सुरू आहे. त्यामुळे खिंडीत वाहतूक कोंडी होत आहे.



भिसेखिंडीतील रस्ता हा नागमोडी वळणाचा आहे. अशा नागमोडी वळणावरच ही वाहने बंद पडत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या मालवाहू अवजड वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक माल भरू दिल्यास अशा प्रकारच्या होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळता येतील. यासाठी रोहा तसेच नागोठणे हद्दीतील वाहतूक प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने पाहणे आता गरजेचे झालेले आहे.

## पेणमध्ये महिला शेतकरी दिन उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने १५ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय महिला शेतकरी दिन म्हणून साजरा करायचे ठरवले आहे. यानिमित्त महिला किसान अधिकार मंच (मकाम) या राष्ट्रीय मंचामार्फत अभियान राबविण्यात येत आहे. याचा एक भाग म्हणून पेण तालुक्यातील जुलै महिन्यातील दरडग्रस्त, अतिवृष्टीत वनहक्क मान्यताप्राप्त जमिनीवर झालेल्या नुकसानाबाबत आदिवासी शेतकरी महिलांन शासनाचे लक्ष वेधून स्वाक्षरी अभियान सुरू केले आहे.

याबाबत माहिती देताना जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील म्हणाल्या, दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस म्हणून साजरा करण्या संबंधीचा ठराव २००७ साली संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संमत केला.



या ठरावात ग्रामीण विकास, अन्न सुरक्षा आणि गरिबीचे निर्मूलन यांत ग्रामीण महिलांचे योगदान असल्याचे नमूद करण्यात आले. आपल्या देशात हा दिवस राष्ट्रीय महिला शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिन साजरा करताना आपल्याकडे कर्तबगार ग्रामीण स्त्रियांचा सत्कार वगैरे कार्यक्रमांचे आयोजन होते खरे, मात्र त्या पलिकडे पोहोचत महिला शेतकऱ्यांच्या सबलीकरणासाठी पुरेशी पावले उचलली जाणे अत्यावश्यक आहे.

# सुधागडमध्ये महिला मेळाव्यात कृषीविषयक मार्गदर्शन

### कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सन्मान

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील कासारवाडी येथे महिला किसान दिनानिमित्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तज्ज्ञांनी कृषी विषयक मार्गदर्शन केले, तसेच कृषीक्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे महिला मंडळ व महिलांचा सन्मान करण्यात आला.



कासारवाडी गावच्या महिला शेतकरी अलका दिलीप मांगले यांनी प्रार्थना म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र रोहा येथील विषय विशेषज्ज्ञ सुधाकर पाध्ये यांनी पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले व नाचणीपासून विविध प्रकारचे पदार्थ बनवण्याविषयी माहिती दिली. प्रभारी मंडळ कृषी अधिकारी परळी कोळपे एस. के. यांनी विविध योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमामध्ये महिला शेतकरी निहारिका शिर्के-पुई, आशा कांबळे-परळी, अक्षता फाटे-नाडसुर, सुषमा फाटे-नाडसूर, रंजना मालुसरे-कासारवाडी, कलावती मालुसरे-कासारवाडी व महिला शेतकरी गट जय योगेश्वर महिला मंडळ-कासारवाडी, विरेश्वर महिला मंडळ-आसरे यांना सन्मानचिन्ह देण्यात आले.

कळंब येथील शेतकरी सूर्यकांत कराळे यांनी सेंद्रिय शेतीविषयी माहिती दिली. पुई येथील शेतकरी निलेश शिर्के यांनी पौष्टीक तृणधान्य नाचणीविषयी भविष्यातील संधी याविषयी मार्गदर्शन केले. कासारवाडी गावच्या महिला शेतकरी नंदिनी मांगले यांनी योजना व त्यामधून होणारा फायदा या विषयी माहिती दिली. पीएमएफएमई अंतर्गत नंदिनी राजेश मांगले यांचा पापड उद्योग व नंदकुमार साळवी यांच्या पिठाची चक्कीचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी कृषी सहायक कळंब वैशाली कोळपे यांनी उपस्थित महिला शेतकऱ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमास कृषी सहाय्यक अनिल कोळी, गणेश साखरे, विवेक कापुरे, साईनाथ तांबोळी, जगदीश कंठाळे व सोनाली दराडे उपस्थित होते.

## वेणगाव येथील जागृत श्री महालक्ष्मी देवी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-जांभिवली रस्त्यावर वेणगाव येथे श्री महालक्ष्मी स्वयंभू देवस्थान आहे. हे महालक्ष्मी देवस्थान प्राचीन असून पंचक्रोशीत तसेच मुंबई, पुण्याहून असंख्य भाविक नवरात्रोत्सवात आवर्जून दर्शनासाठी येतात. हे जागृत देवस्थान आहे.

१८५७च्या आंदोलनातील पुढारी नानासाहेब पेशव्यांचा जन्म या वेणगाव गावी झाला. नवरात्रीला श्री महालक्ष्मी मंदिरात उत्सव व यात्रा भरते. या देवास्थानची आख्यायिका अशी सांगितली जाते की, कोल्हपुरची श्री महालक्ष्मी आपल्या बहिणीस भेटावयास जाताना तिच्या रथाचे चाक घसरले व थोड्याच अंतरावर रथाच्या एका घोड्याचा पाय घसरला. श्री महालक्ष्मी तेथेच वास करून राहिली, ते ठिकाण म्हणजेच सद्यस्थितीतील असलेले श्री महालक्ष्मी मंदिर होय. देवीच्या रथाचे चाक व घोड्याचा पाय जेथे घसरला ती ठिकाणे मंदिर परिसरात आजही पहावयास मिळतात.

सुमारे २०० वर्षांपूर्वी वेणगाव येथील एक गावकऱ्याच्या स्वप्नात देवीने येऊन येथे वास करीत असल्याचा दृष्टांत दिला व गावकऱ्यांनी तिथे निवारा बांधला व श्री देवीचे दैनंदिन पुजा-अर्चा, सांजवात सुरू केली व ती आजतागायत अव्याहतपणे सुरू आहे.



काळाच्या ओघात मंदिर जिर्ण झाले होते तसेच भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी या मंदिराचा जीर्णोद्धार १९९७साली विश्वस्त समितीने केला. देवीचे सथान स्वयंभू असून तिच्या नवसाची प्रचिती अनेक भक्तांना आलेली आहे. हे मंदिर अतिशय रम्य अशा ठिकाणी आहे. आजूबाजूला डोंगर, शेती, वनश्री असल्याने या परिसरात आल्यावर खूपच प्रसन्न वाटते.

ट्रस्टतर्फे त्रिपुरा पौर्णिमा, हनुमान जयंती, होळी पोर्णिमा, सीमोल्लंघन व माघी गणेशोत्सव आदी कार्यक्रम केले जातात. नवरात्रीत नऊ दिवस दर्शनासाठी गर्दी होते. नऊ दिवस येथे पुजा सप्तशक्ती पाठ, पठण, अभिषेक, भजन-किर्तन असे कार्यक्रम आयोजित केले जातात, घट उत्थापनाचे दिवशी नवचंडीचा होम केला जातो.

## संस्कृती, परंपरेचा वारसा लाभलेला रानसईचा नवरात्रोत्सव

**चौक : प्रतिनिधी**

६४ वर्षानंतरदेखील रानसई या कोयना प्रकल्प गावच्या नवरात्रौत्सवात संस्कृती परंपरेचा वारसा कायम आहे. सातारा जिल्ह्यातील मूळगाव उचाट (रानसई) या गावची गावडाई झोलाई हिचे मंदिर १९६१ साली रायगड जिल्ह्यातील खोपोली-पेण रस्त्यावरील रानसई या गावात झाले. महाबळेश्वर खोऱ्यात निसर्गाच्या सान्निध्यात राहिलेले गाव कोयना धरणाच्या निर्मिती मुळे खालापूर तालुक्यात स्वकष्टाने वसाहत करून राहिले.



कोयना धरणाची निर्मिती करण्याचे घोषित झाले. आपले अस्तित्व, आपले घर, आपली शेती, जमीन आणि आपली श्रद्धास्थाने सोडून जावे लागणार याची कल्पना आली. आयुष्यभर ज्या मातीत ज्याच्यावर अपार प्रेम आणि श्रद्धा ठेऊन घनदाट जंगलात वास्तव्य केले, देवीवर श्रद्धा ठेऊन शेती करून उपजीविका केली, ते सर्व सोडून कोणत्या ठिकाणी जाणार याची कल्पनादेखील नव्हती.

हे सगळे घडत असताना गावातील एक ज्येष्ठ महिला सुंदराबाई यांना दृष्टांत झाला, त्यांना आपले वास्तव्य नदीत असल्याचे देवीने सांगितले, त्यानुसार त्यांनी गावाला दृष्टांत सांगितला. ग्रामस्थांनी नदीतील दोन पाषाण शोधून त्यांची विधिवत पूजा केली, त्याच आता मंदिरात श्री गावडाई व झोलाईच्या रूपात आहे.

येथे गाव आल्यावर घरासारखेच असलेले मंदिर आज भव्य कळसाच्या मंदीरात रूपांतर झाले आहे. रानसई ग्रामस्थ यांच्या बरोबर या परिसरातील लोकांचा श्री गावडाई झोलाई या देवीवर अपार श्रद्धा आहे. नवरात्रोत्सवात नऊ दिवस परिसरातील नागरिक येथे दर्शन आणि ओटी भरण्यास येतात. दररोज भक्तीमय वातावरण असते. दररोज भक्तीमय कार्यक्रम सुरू असतात.

या गावचे विशेष म्हणजे पूर्ण एक आठवडा एकाच कुटुंबाने देवीची पूजा, आरती याबरोबर मंदिराची स्वच्छ्ता करण्याचा पायंडा आहे. त्यामुळे पूर्ण वर्ष देवीची नित्यनियमाने पुजा-अर्चा होते.

## चरस बाळगल्याप्रकरणी मुरूडमधील दोघांना पोलीस कोठडी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पोलिसांनी शहरातील खाजण परिसरात नशा करण्यासाठी चरस अमली पदार्थ बाळगणारे कौशल गुरव व मैथाली शिरवणकर यांना सोमवारी ताब्यात घेतले होते. या दोघांना अलिबाग येथील न्यायालयात मंगळवारी (दि. १७) हजर केले असता त्यांना न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

पोलीस कस्टडीत या दोघांची चौकशी केली असता चरस सदृश्य वस्तू ही समुद्रकिनाऱ्यावर सापडली असल्याचे सांगितले आहे.



**पेण : येथे भारतीय ग्रुपच्या भारती फॅशन पॉईंट या दुकानाचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

## खालापुरात निवडणूक अर्जाचा दुसरा दिवसही निरंक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. १६ ऑक्टोबरपासून नामनिर्देशन पत्र सादर करण्याची सुरुवात होती, परंतु खालापूर तालुक्यात पहिल्या व दुसऱ्या दिवशीही एकही नामनिर्देशन पत्र सादर झाले नाही. त्यामुळे उरलेल्या तीन दिवसात मोठी गर्दी होईल असा अंदाज आहे.

खालापूर तालुक्यातील एकूण २२ ग्रामपंचायतींमधून थेट २२ सरपंच व २२ ग्रामपंचायतीच्या ७५ प्रभागातून ग्रामपंचायत एकुण सदस् २०२ निवडून येणार आहेत. उंबरे ग्रामपंचायत मधून एका जागेसाठी पोट निवडणूक होणार आहे. त्यामुळे एकूण २०३ सदस्यांची निवड होणार आहे. मंगळवारी अर्ज दाखल करण्याचा दुसरा दिवस होता, तरीही एकही नामनिर्देशन पत्र सादर करण्यात आले नाहीत. त्यातच सोमवारी ऑनलाईन अर्ज भरले जात नव्हते. अर्ज भरण्याची वेबसाईट ओपन होत नव्हती. त्यामुळे अनेक उमेदवारांची दमछाक झाली होती.

# कळंबोली सुधागड हायस्कूलचा संघ राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेसाठी पात्र

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

मुंबईतील कांदिवली येथे झालेल्या डॉजबॉल विभागीय स्पर्धेत सुधागड हायस्कूल कळंबोलीच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. हा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

या संघात प्रज्ञा सचिन गाडे, संजीवनी दीपक जगदाळे, स्नेहल भिवा धायगुडे, श्रेया सुखदेव पोळ, मयुरी संतोष पिसे, अस्मिता कृष्णा लावंड, चैताली धनाजी बंडगर, प्रज्ञा विजय बावसकर यांचा समावेश होता, तर त्यांना प्रशिक्षक विलास पाटील, विकास नाईक, ऋजुला वाशिकर यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य राजेंद्र पालवे, उपमुख्याध्यापक सुरेश मोरे, पर्यवेक्षक सुरेश शिंदे, बाबुराव शिंदे, अनिता पाटील, कार्यालयीन अधीक्षक दत्ता शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.





# रोलर स्केटिंग स्पर्धेत पनवेल येथील खेळाडूंचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि रोलर स्केटिंग असोसिएशन अलिबाग यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या रायगड डिस्ट्रिक्ट स्केटिंग चॅपियनशिपमध्ये पनवेल येथील टी ७५ रोलर स्केटिंग क्लबच्या मुली व मुलांनी पाच रौप्य आणि १६ कांस्यपदके जिंकून यशस्वीरीत्या विजय मिळवला.

यामधील विजेते अद्रिका भोसले, याद्रिक्य पाटील, नव्या बाटले, आरुष वाणी, साजिरी मंडलिक, मैत्री बोडकर आणि काव्यांश राजपुरोहित यांची विरार येथे होणाऱ्या ३३व्या महाराष्ट्र राज्य रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपसाठी रायगड संघात निवड झाली आहे.

याशिवाय खोपोली येथे झालेल्या इंटर स्कूल स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये अद्रिका भोसले, याज्ञिक्य पाटील व काव्यांश राज पुरोहित या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. याबद्दल त्यांची इंटरनॅशनल झोनल स्केटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक प्रसाद महेश ढवळे यांचे मार्गदर्शन लाभले.







पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने झंकार नवरात्रोत्सवाचे आयोजन सोसायटी मैदानावर करण्यात आले आहे. या उत्सवाला सोमवारी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह इतर मान्यवरांनी भेट देत दुसऱ्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, भाजप शहर खजिनदार संजय जैन, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, अमोघ ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

नवीन पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर विचार मंचच्या वतीने माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवाचे आयोजन नवीन पनवेल येथील सिडको मैदानावर करण्यात आले आहे. येथे गरबा खेळण्यासाठी दुसऱ्या दिवशी चिमुकल्यांसह महिला, युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





## नवरात्रीचे नवरंग (रंग : लाल)



फ्युचर हिल्स सोसायटी, आकुर्ली, पनवेल



ओम योगा आणि प्राणायम सेंटर, नवीन पनवेल



अ.पां. भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनिअर कॉलेज, दापोली पारगाव, पनवेल



स्नेहश्री सीकेपी महिला मंडळ, पनवेल



जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, खारकोपर, उलवे नोड



तु. ह. वाजेकर हायस्कूल, फुंडे, उरण शिक्षिका व माता पालक.



नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १६, शिवाजीनगर, नेरूळ



प्रगती महिला मंडळ, नेरूळ, नवी मुंबई



सावित्री महिला मंडळ, नेरूळ, नवी मुंबई



सिद्धिविनायक महिला मंडळ चिरले, उरण

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com